महायोगी श्रीअरविंद विरचित

# ‘सावित्री’ महाकाव्य

## (अल्प - परिचय)

ज्योतिर्मयी मिडिया हाऊस, पुणे



रात्र अदितीचे रहस्य दडवून ठेवते.
आत्म्याची किमयागार ऊर्जा ही अदितीची असते.
अदिती ही एक सुवर्णमयी दुवा आहे, ती अद्भुत अग्नी आहे.
अज्ञाताचे तेजोमय हृदय म्हणजे ती आहे,
ती म्हणजे ईश्वरी गहनतेमधील शांततेची शक्ती आहे.
तीच आहे शक्ती, ती आहे अटळ शब्द,
आपल्या अवघड चढणीचे लोहचुंबक तीच आहे,
आपले सर्व सूर्य, आपण ज्या सूर्यापासून प्रज्वलित करून घेतो
तो सूर्य ती आहे;
प्रत्यक्षात न उतरलेल्या व्यापकतेतून खाली झुकलेला
प्रकाश म्हणजे ती आहे.
अशक्यामधून दीपस्तंभाप्रमाणे कार्य करणारा
आनंद हा तिचा आहे,
जी आजवर कधीही खाली उतरून आलेली नाही अशी
प्रचंडता म्हणजे ती आहे.

- श्रीअरविंद (CWSA 33-34 : 314)


*

महायोगी श्रीअरविंद विरचित

# ‘सावित्री’ महाकाव्य

## (अल्प - परिचय)

ज्योतिर्मयी मिडिया हाऊस, पुणे

श्रीमाताजी आणि श्रीअरविंद
यांच्या चरणी सविनय समर्पित

❖

आवृत्ती : फक्त ई-आवृत्ती
प्रकाशक : ज्योतिर्मयी मिडिया हाऊस, पुणे
प्रकाशन : २४ जानेवारी २०२६
पुस्तक क्रमांक : ०४
पृष्ठसंख्या : ८३

आमचे इतर प्रकल्प
'अभीप्सा' मराठी मासिक संपर्क
ई-मेल : editorabhipsa2018@gmail.com
फेसबुक : https://www.facebook.com/abhipsa.masik.5/
युट्यूब : https://www.youtube.com/@auromarathi682
संकेतस्थळ : auromarathi.org

# अनुक्रमणिका


प्रस्तावना........................................................................०७

सावित्री महाकाव्याच्या महाद्वारी......................................१०

प्रयोगाचे एक क्षेत्र - ‘सावित्री’ महाकाव्य...........................१४

सावित्री महाकाव्यामधील प्रतीकात्मकता...........................२३

सावित्री महाकाव्याविषयी श्रीमाताजी...............................२८

सावित्री महाकाव्याचा सारांश..........................................४०

सावित्री महाकाव्यामधील निवडक पंक्ती...........................६८


## परिशिष्टे


०१) सावित्री महाकाव्याची मांडणी..................................७३

०२) सावित्री महाकाव्यावरील मराठीतील लेखन..................७६

०३) सावित्री महाकाव्य - आख्यायिका आणि रूपक...........७८

# प्रस्तावना

“सावित्री - अ लिजंड अँड अ सिम्बॉल’ ही श्रीअरविंदांनी समस्त मानवाजातीस देऊ केलेली सर्वांत महत्त्वाची देणगी आहे. ‘सावित्री’ हे अनेक अर्थांनी भविष्यकालीन महाकाव्य आहे. या महाकाव्यामध्ये श्रीअरविंदांच्या क्रांतदर्शी दृष्टीचे दर्शन घडते. मानववंशाच्या निर्मितीपूर्वी जे जे उदयाला आलेले आहे ते ते सारे आणि मानवानंतर जे उदयाला यायचे आहे ते ते सारे येथे यथार्थपणे अभिव्यक्त करण्यात आलेले आहे. अश्वपती आणि सावित्रीच्या अनुभवांद्वारे मानवाने भविष्यात चोखाळला पाहिजे असा मार्ग येथे दाखवून देण्यात आला आहे. भविष्यामध्ये मानवाला कोणकोणत्या अनुभवातून जावे लागणार आहे आणि सरतेशेवटी त्याच्या जीवनाचे स्वरूप हे दिव्य पायावर कसे प्रतिष्ठित केले जाणार आहे, याचेही दिशादर्शन यामधून घडते.

महाभारतातील सत्यवान-सावित्री या आख्यानावर आधारित असलेले हे महाकाव्य ‘पूर्णयोगा’च्या साधनेच्या दृष्टीने पथदर्शक बनते. श्रीमाताजींनी म्हटले आहे त्याप्रमाणे, ‘सावित्री’ हा रूपांतरणाचा मंत्र आहे.


‘सावित्री’ महाकाव्याच्या वाचनाच्या, लेखनाच्या, श्रवणाच्या, चिंतनाच्या आणि ध्यानाच्या माध्यमातून, आपण जितके त्या वातावरणात अधिकाधिक राहण्याचा प्रयत्न करतो, तितक्या अधिकाधिक रितीने आपण, सावित्री आपल्यासाठी जे आणू इच्छिते, त्या भविष्याकालीन सौंदर्यात आणि सत्याच्या प्रकाशात वृद्धिंगत होऊ लागतो.

महायोगी श्रीअरविंद विरचित ‘सावित्री’ महाकाव्य (अल्प - परिचय) या पुस्तकामुळे, पूर्णयोगाच्या साधकांच्या मनामध्ये या महाकाव्याचे मुळातून वाचन करण्याची प्रेरणा निर्माण होईल, असा विश्वास वाटतो.

डॉ. केतकी मोडक

संपादक, ‘अभीप्सा’ मराठी मासिक

**





"सर्वांसाठी बंद असणारा दरवाजा, काही जणं मात्र उघडू शकतात; चैतन्याचे साम्राज्य मनुष्याच्या केवळ आंतरिक अस्तित्वातच नव्हे तर ते त्याच्या जीवनात आणि त्याच्या कर्मामध्येही प्रस्थापित होऊ शकेल. या क्रांतीमध्ये काव्यसुद्धा त्याचे योगदान देऊ शकेल आणि या आध्यात्मिक साम्राज्याचा एक भाग बनू शकेल."

- श्रीअरविंद (CWSA 27 : 357)

(अशी श्रीअरविंदांची धारणा होती. 'सावित्री' महाकाव्य म्हणजे याच धारणेचे मूर्तरूप आहे, असे म्हणता येईल.)

*

**श्रीअरविंद यांच्या हस्ताक्षरातील 'सावित्री' मंत्र**



**तत्सवितुर्वरं रूपं ज्योतिः परस्य धीमहि ।**

**यन्नः सत्येन दीपयेत् ॥**

'सावित्री'च्या अत्यंत पवित्र (सर्वोत्तम) अशा रूपाचे आपण ध्यान करू, परमेश्वराच्या प्रकाशाचे आपण ध्यान करू, जेणेकरून तो प्रकाश सत्यासहित आपल्याला प्रदीप्त करेल.

- श्रीअरविंद (CWSA 35 : 31)

*

# सावित्री महाकाव्याच्या महाद्वारी

## सावित्री म्हणजे...

• 'सावित्री' हे महाकाव्य श्रीअरविंदांच्या दिव्य दृष्टीचे अत्युच्च प्रकटीकरण आहे. हे महाकाव्य म्हणजे, ज्यांनी ते लिहिले आहे त्या श्रीअरविंदांच्या आध्यात्मिक अनुभूतींची दैनंदिन नोंद आहे.

• ज्यांना पूर्णयोगाची साधना करायची आहे त्यांच्यासाठी मार्गदर्शक ठरू शकेल अशी योगाची एक समग्र प्रणाली म्हणजे सावित्री.

• सावित्री म्हणजे पृथ्वीचा ईश्वराप्रत चाललेल्या आरोहणाचा योग !

• दिव्य माता पृथ्वीवर अवतरली आहे. पृथ्वीवरील फसवेगिरी आणि अज्ञान यांच्याशी दोन हात करण्यासाठी, तिने (स्वतःचा दिव्य देह बाजूला ठेवून) मानवी देह धारण केला आहे; त्या मानवी देहाशी जुळवून घेण्यासाठी ती जे अपार कष्ट सोसत आहे ते सर्व अनुभव 'सावित्री'मध्ये ग्रथित करण्यात आले आहेत.

- श्रीमाताजी (CWM 13 : 24)

*

## सावित्रीचे लेखन

'सावित्री'चे पहिले हस्तलिखित उपलब्ध आहे ते इ. स. १९१६ मधील आहे. सुरुवातीच्या काळात एक वर्णनात्मक काव्य असे त्याचे रूप होते. पुढे या काव्यावर अनेक परिष्करणे करण्यात आली. आपल्या चढत्या वाढत्या आध्यात्मिक अनुभवानुसार श्रीअरविंद या महाकाव्याच्या रचनेत उत्तरोत्तर बदल करत होते.

श्रीअरविंदांनी त्याला व्यापक आणि अधिक गहन अर्थ प्रदान करत, त्या काव्याचे महाकाव्यात रूपांतर करण्याचे कार्य इ. स. १९३० च्या सुमारास पुन्हा एकदा हाती घेतले. 'सावित्री'चे पुनर्लेखन हाती घेण्यापूर्वी श्रीअरविंदांनी दिव्य जीवन, योगसमन्वय, वेदरहस्य, गीतेवरील निबंध, दिव्य माता इ. चे लेखन हातावेगळे केले होते.

'सावित्री - एक आख्यायिका आणि एक प्रतीक', हे महाकाव्य म्हणजे

त्यांची सर्वाधिक महत्त्वाची साहित्यकृती ठरली. या महाकाव्याच्या परिष्करणाचे काम ते त्यांच्या अखेरच्या दिवसांपर्यंत करत होते. 'सावित्री'चा आधीचा मसुदा आणि नंतरचा मसुदा यातील फरक स्पष्ट करताना, श्री अरविंदांनी एके ठिकाणी लिहून ठेवले आहे की, "आधीच्या मसुद्यात 'सावित्री' ही फक्त एक आख्यायिका होती, त्यात प्रतीकात्मकता नव्हती. पुनर्लेखनामध्ये त्यांनी ती प्रतीकात्मकता आणण्याचा प्रयत्न केला आणि आधीच्या लिखाणातील जो भाग त्या चौकटीत बरोबर सामावला जाऊ शकेल केवळ तेवढाच भाग पुढील लेखनात कायम ठेवला."

इ. स. १९४० च्या सुमारास जेव्हा त्यांची शारीरिक दृष्टी साथ देईनाशी झाली तेव्हा त्यांचे शिष्य निरोदबरन हे लेखनिक झाले आणि त्यांच्या मदतीने श्रीअरविंदांनी हे लिखाण हे पूर्ण केले. डिसेंबर इ. स. १९५० मध्ये, महासमाधीच्या थोडेच दिवस आधी त्यांनी सावित्री या महाकाव्याची रचना पूर्ण केली. इ. स. १९४६ सालापासून त्यातील काही भाग प्रथमतः प्रकाशित होऊ लागले. 'सावित्री' या महाकाव्याच्या पहिल्या भागाची पहिली आवृत्ती इ. स. १९५० मध्ये प्रकाशित झाली. श्रीअरविंदांच्या हयातीमध्ये हा संपूर्ण ग्रंथ प्रकाशित होऊ शकला नाही. त्यांच्या महासमाधीच्या पुढच्या वर्षभरात दुसऱ्या खंडाच्या रूपाने तो समग्रपणे प्रकाशित करण्यात आला.

- श्रीअरविंद (CWSA 33-34) & (Perspectives of Savitri, Part 1 : 275-276)

*

## मध्यवर्ती कल्पना

मरण पावलेल्या सत्यवानाचे प्राण मृत्युदेवतेच्या पाशातून खेचून आणणाऱ्या सावित्रीचे महाभारतातील आख्यान सर्वश्रुत आहे. श्रीअरविंदांनी या कथेचे रूपक वापरून, आध्यात्मिक जीवनाच्या वाटचालीचा प्रवासच आपल्याला ज्ञात करून देण्याचा प्रयत्न 'सावित्री' या महाकाव्याच्या माध्यमातून केला आहे. प्रेमाचा मृत्युवरील विजय व आत्म्याचा अंतिम विजय आणि जीवनाचे रूपांतरण ही या महाकाव्याची मध्यवर्ती कल्पना आहे. ही संकल्पना चेतनेच्या उत्क्रांतीचे पूर्णत्व आणि पृथ्वीवरील अतिमानसिक

जीव-वंशाचा उदय याच्याशी संबंधित आहे. मानवाच्या अभ्युदयासाठी दिव्य शक्तीचे पृथ्वीवरील अवतरण हा सावित्रीचा गाभा आहे.

## वैशिष्ट्ये

• सावित्रीच्या काव्यविस्ताराची कल्पना येण्यासाठी त्यातील ओळींचा विचार करता येईल. या महाकाव्यामध्ये २३८१३ (तेवीस हजार आठशे तेरा) पंक्ती असून, हे इंग्रजी भाषेतील सर्वांत मोठे दीर्घ काव्य आहे.

• या महाकाव्याची रचना ही एकमेवाद्वितीय आहे. पंचपदी मुक्तछंदात्मक अशी ही रचना आहे. इंग्रजी काव्यात सर्वसाधारणतः मुक्तछंदात्मक काव्यरचनेचा जो आराखडा असतो त्याच्यापेक्षा ही रचना वेगळी आहे.

• या काव्यातील प्रत्येक पंक्ती स्वतंत्र आहे आणि जास्तीत जास्त पाच ते सात पंक्तींचे मिळून एक वाक्य आहे. वाक्यामध्ये सहसा एक, दोन, तीन किंवा चार पंक्ती येतात, अगदी क्वचित पाच किंवा सहा किंवा सात पंक्ती येतात.

• प्रत्येक पंक्ती स्वतंत्रपणे आस्वाद्य होऊ शकेल इतपत सशक्त असली पाहिजे आणि त्याच वेळी, जणू एका चिऱ्यावर दुसरा चिरा रचावा त्याप्रमाणे ती एखाद्या वाक्यामध्ये किंवा एखाद्या परिच्छेदामध्येदेखील, अगदी समर्पकपणे रचली गेली पाहिजे, अशी या महाकाव्याची रचना आहे.

• 'सावित्री हे महाकाव्य म्हणजे आधुनिक काळातील वेद' असे म्हणले जाते. या महाकाव्यात अध्यात्माचा इतिहास, तत्त्वज्ञान, गूढवाद, परलोकज्ञान, भविष्याचे दर्शन या गोष्टी आहेत.

*

## आधुनिक व्यास आणि विनायक

साधारणपणे इ. स. १९४० च्या दशकामध्ये श्रीअरविंदांनी स्वतः हाताने लिहिण्याऐवजी, निरोदबरन यांना 'सावित्री'चे लिखाण कथन (डिक्टेट) करायला सुरुवात केली. श्रीअरविंद या आधुनिक व्यासांचे निरोदबरन हे जणू विनायक बनले.

श्रीअरविंदांसाठी आता 'सावित्री' हाच एक महत्त्वाचा ध्यास बनला होता. त्यांनी मध्ये अजिबात विश्रांती न घेता एकदा निरोदबरन यांना सलगपणे चारशे ते पाचशे ओळी अखंडितरित्या सांगितल्या होत्या. निरोदबरन त्याविषयी सांगतात, "त्या काव्यपंक्तींचे सौंदर्य आणि त्यांचा ओघ म्हणजे श्रीअरविंदांच्या जादुई भाषेचा व वैश्विक दृष्टीचा आनंद होता."

इ. स. १९५० च्या सुमारास मात्र श्रीअरविंद अत्यंत तातडीने सावित्रीचे लेखन करू लागले. "मला 'सावित्री'चे लिखाण लवकरात लवकर पूर्ण करायचे आहे," असे त्यांनी निरोदबरन यांना सांगितले होते.

तशातच आता जणू काही काळाबरोबर शर्यत चाललेली असावी अशा त्वरेने ते अनुलेखन (dictations) देत होते. इ. स.१९५० च्या अखेरीस श्रीअरविंदांनी 'नियती' या पर्वामधील 'नियतीचा मार्ग आणि दुःखाची समस्या' या दुसरा प्रदीर्घ सर्गाचे कथन केले, डिक्टेशन दिले.

पुनर्लेखन केलेल्या इतर अध्यायांशी मिळतेजुळते असे अवघे दोनच सर्ग पुन्हा लिहायचे बाकी होते. मृत्यू आणि उपसंहार (पृथ्वीवरील पुनरागमन) या दोन सर्गांमधील सुधारणा करण्याचे काम तेवढे बाकी होते.

एकदा श्रीअरविंदांना या अपूर्ण राहिलेल्या सर्गांची आठवण करून देण्यात आली, तेव्हा ते एवढेच म्हणाले, "ओह, ते का ? ते आपण नंतर बघू." अपूर्ण राहिल्यासारखे दिसणारे हे काम वास्तविक पाहता तसे अपूर्ण नव्हते.

पुनर्लेखनाचे काम पूर्ण झाल्यानंतर 'सावित्री' महाकाव्याचा दुसरा खंड इ. स. १९५१ मध्ये प्रकाशित करण्यात आला. श्रीअरविंदांनी देह ठेवल्यानंतर चार वर्षांनी, म्हणजे १५ ऑगस्ट १९५४ रोजी, 'Savitri, a Legend and a Symbol' या ग्रंथाचे श्रीअरविंद-आश्रमातर्फे प्रकाशन करण्यात आले. त्यामध्ये श्रीअरविंदांची 'सावित्री'वरील पत्रेही समाविष्ट करण्यात आली होती.

(Perspectives of Savitri, Part I : 276-277)

**

# प्रयोगाचे एक क्षेत्र - सावित्री महाकाव्य

'सावित्री' हे एक आगळ्यावेगळ्या प्रकारचे काव्य आहे, ही काव्यनिर्मिती म्हणजे एक प्रकारे योगसाधनाच होती आणि त्याचे वाचन ही देखील एक साधनाच होऊ शकते.

२४ नोव्हेंबर १९२६ रोजी झालेल्या अधिमानसाच्या साक्षात्कारानंतर, पूर्वनिर्धारित आध्यात्मिक क्रांती आणि अतिमानसिक रूपांतरण नियोजित वेळेपेक्षा आधीच होण्याची शक्यता श्रीअरविंदांच्या दृष्टिपथात आली असावी. त्यांच्या संपूर्ण एकांतवासात निघून जाण्याचे आणि आपल्या स्वतःच्या साधनेवर लक्ष केंद्रित करण्याचे ते एक कारण होते. 'सावित्री'चे लेखन हे त्यांच्या योगसिद्धीचे एक महत्त्वाचे साधन, किंबहुना अतीव महत्त्वाचे साधन बनले.

श्रीअरविंदांनी निरोदबरन यांना लिहिलेल्या एका पत्रामध्ये नमूद केले आहे की, "आरोहणाचे एक माध्यम या दृष्टीने मी 'सावित्री'चे लेखन केले. एका विशिष्ट अशा मानसिक स्तरावरून मी त्याच्या लेखनास सुरुवात केली होती आणि प्रत्येक वेळी जेव्हा जेव्हा मी एका नव्या उंचीवर जाऊन पोहोचत असे तेव्हा तेव्हा त्या स्तरावरून मी त्याचे पुनर्लेखन करत असे...

खरं सांगायचे तर, 'सावित्री' हे माझ्या दृष्टीने लिहून हातावेगळे करायचे काव्य नव्हे, तर व्यक्ती स्वतःच्या योगिक चेतनेमधून कोणत्या स्तरावरील काव्यनिर्मिती करू शकते आणि अशा प्रकारचे काव्य हे कसे सर्जक ठरू शकते, हा प्रयोग करण्याचे क्षेत्र आहे."

(Perspectives of Savitri, Part 01 : 276)

*

"गूढवादी, आध्यात्मिक काव्य प्रतीकात्मक आकृतिबंधाच्या साच्यामध्ये ओतण्याचा प्रयोग म्हणजे सावित्री," असे या महाकाव्याचे वर्णन श्रीअरविंदांनी एके ठिकाणी केले आहे.

(Perspectives of Savitri, Part 01 : 300)

*

## सावित्री महाकाव्याची शैलीविशिष्टता

(०३ जानेवारी १९३९ रोजी निरोदबरन आणि श्रीअरविंद यांच्यामध्ये झालेला हा संवाद 'सावित्री'च्या लेखनशैलीवर काही प्रकाश टाकणारा आहे.)

निरोदबरन : तुमचे 'सावित्री'चे लिखाण कुठपर्यंत आले आहे ? त्याचा पहिला मसुदा लिहून पूर्ण झाला का ?

श्रीअरविंद : हो, पहिला मसुदा लिहून पूर्ण झाला आहे, पण मला त्यात पुन्हा काही सुधारणा करायच्या आहेत. मी तुम्हाला मागे म्हटले त्याप्रमाणे, मी या काव्यामध्ये बारा वेळा सुधारणा केल्या आहेत आणि असे करत आत्ता कुठे यातील पहिल्या पर्वाचा पहिला भाग पूर्ण झाला आहे.

निरोदबरन : तुम्ही त्यासाठी कोणता साहित्यप्रकार योजला आहे ?

श्रीअरविंद : मी त्यासाठी शेक्सपिअर आणि मार्लो यांचे साहित्य विचारात घेतले. सावित्री महाकाव्यातील प्रत्येक पंक्ती ही स्वतंत्र आहे. आणि जास्तीत जास्त पाच ते सहा पंक्तींचे मिळून एक वाक्य बनलेले आहे.

- श्रीअरविंद (Talks with Sri Aurobindo by Nirodharan)

*

## सावित्री महाकाव्याची मांडणी (संक्षिप्त)

'सावित्री' या महाकाव्याची रचना त्रिखंडात्मक आहे. त्यातील पहिला खंड 'अश्वपतीचा योग', दुसरा खंड 'सावित्री व तिचा योग' आणि तिसरा खंड 'सावित्री व यम संवाद' यास वाहिलेला आहे.

प्रत्येक खंडामध्ये काही पर्वं आहेत आणि प्रत्येक पर्वामध्ये काही सर्ग आहेत. Part, Book, Canto यांना अनुक्रमे खंड, पर्व, सर्ग अशा संज्ञा वापरलेल्या आहेत.

०१) पहिल्या खंडामध्ये तीन पर्व आहेत. उपोद्घात, लोकलोकांतराचा प्रवासी आणि दिव्य माता अशी ही तीन पर्व आहेत.

०२) दुसऱ्या खंडामध्ये पाच पर्व आहेत. जन्म आणि शोध, प्रेम पर्व, नियती पर्व, योग पर्व, आणि मृत्यू पर्व अशी पाच पर्व आहेत.

०३) तिसऱ्या खंडामध्ये चार पर्व आहेत. शाश्वत रात्र, द्विविध

संधिप्रकाश, शाश्वत दिन, आणि उपसंहार अशी ही चार पर्व आहेत.

'Savitri, a Legend and a Symbol' या महाकाव्याची तीन खंड, बारा पर्व आणि एकोणपन्नास सर्ग अशी मांडणी आहे. या महाकाव्यामध्ये २३८१३ पंक्ती असून, हे इंग्रजी भाषेतील सर्वांत मोठे दीर्घ-काव्य आहे.

*

## सावित्री महाकाव्य - आत्मपर लेखन?

'सावित्री' या महाकाव्यामध्ये श्रीअरविंदांचे आध्यात्मिक आत्मचरित्रच समाविष्ट झाल्यासारखे आहे. अश्वपतीचा योग या भागाची रचना २२ सर्गांमध्ये करण्यात आली आहे. श्रीअरविंदांना बडोदा, अलिपूर, चंद्रनगर व पाँडिचेरी येथे आलेल्या आध्यात्मिक अनुभवांचा आणि साक्षात्कारांचा आधार या लेखनास आहे.

श्रीअरविंदांनी त्यांचा शोध आणि त्यांना आढळलेल्या गोष्टी, गुप्त जगतांचा त्यांनी घेतलेला धांडोळा, चैतन्याच्या उच्चतम पर्वतरांगांवर त्यांनी केलेले आरोहण आणि मानवाची समग्र प्रकृती दिव्यत्वात परिवर्तित करण्यासाठी त्यांनी खाली अवतरीत केलेली (उच्चतम चैतन्याची) त्यांची शक्ती या सर्व गोष्टींची 'सावित्री'च्या काव्यरचनेच्या माध्यमातून सुरेख गुंफण केली आहे.

दुसरा खंड हा सावित्री आणि तिचा योग याच्याशी संबंधित आहे. जाणकार वाचकाला सावित्रीच्या योगाचे श्रीमाताजींच्या योगाशी असलेले साधर्म्य लक्षात येण्यासारखे आहे. 'सावित्री' म्हणजे जणू काही श्रीअरविंदांच्या आध्यात्मिक क्षेत्रातील सहयोगिनी असलेल्या श्रीमाताजीच, असे सहसा सूचित होते.

(Perspectives of Savitri)

*

## प्रगमनशील रहस्याचे प्रकटन

मूळ महाभारतामध्ये 'सावित्री' चे आख्यान हे एका व्यक्तीने म्हणजे सावित्रीने मृत्युवर मिळविलेल्या विजयाची, किंबहुना मृत्युदेवाने एका पतिव्रता स्त्रिला तिच्या पतीच्या जीवनाचे जे दान दिले त्याची कहाणी या स्वरूपात येते.

पण अर्थातच येथे श्रीअरविंद हे आख्यान एका वेगळ्याच उंचीवर घेऊन जातात. 'सावित्री' हे एक कथन आहे. ते एका साक्षीदार कवीचे कथन नसून, सहभागी असलेल्या व्यक्तीचे ते कथन आहे. 'सावित्री' हा एक दस्तऐवज आहे, भाकीत आहे, ते एक कथन आहे आणि ती स्वयमेव उलगडत जाणारी एक कृती आहे. आणि सखोल अर्थाने पाहता, 'श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांच्या जीवनाचे ते प्रगमनशील रहस्योद्घाटन' आहे.

(Perspectives of Savitri, Part 01 : 278,285)

*

## अधिमानसिक स्तरावरील काव्यनिर्मिती

...अखिल जगतामधील साहित्यविश्वामध्ये, ज्याची गणना 'उच्च स्तरीय साहित्य' अशी केली जाते, ते साहित्य मनाच्या स्तराच्या वर असणाऱ्या चार स्तरांवरून येते, असे श्रीअरविंद म्हणतात. उच्च मन (Higher Mind), प्रदीप्त किंवा प्रकाशित मन (Illumined Mind), अंत:स्फूर्त मन (Intuitive mind) आणि अधिमानस (Overmind) स्तर हे ते चार स्तर आहेत. पाचवा आणि सर्वोच्च स्तर अतिमानसाचा (Supramental) आहे. अतिमानसाच्या उच्चतम शिखरावर पोहोचून त्याचा साक्षात्कार करून घेणे आणि जडभौतिक अस्तित्वामध्ये त्याचे अवतरण घडविणे, हे श्रीअरविंदांच्या पूर्णयोगाचे ध्येय आहे. अतिमानसाच्या स्तरावरून थेटपणे आलेली अशी अजूनपर्यंत एकही साहित्यकृती निर्माण झालेली नाही, असे ते म्हणतात.

'सावित्री'चे सुमारे बारा वेळा पुनर्लेखन करण्यात आले. या पुनर्लेखनाची दिशा डोक्याच्या वरील स्तरांकडे जाणारी होती. अधिमानसिक काव्याच्या दिशेने चाललेला हा प्रवास होता.

(Perspectives of Savitri, Part 01 : 183, 276)

*

## सावित्री महाकाव्याचे प्रकाशन

के. डी. सेठना ऊर्फ अमल किरण हे १९२७ साली श्रीअरविंदांच्या संपर्कात आले. 'श्रीअरविंद सध्या सावित्री या महाकाव्याचे लेखन करत

आहेत,' अशी वार्ता त्यावेळी त्यांच्या कानी आली. स्वतः सेठना हे उत्तम कवी होते. उच्चस्तरीय प्रांतामधून जी स्फूर्ती येत असे त्याआधारे ते काव्यरचना करत असत. साहजिकच त्यांना 'सावित्री' महाकाव्य वाचण्याची अतीव उत्सुकता होती.

एके दिवशी सेठना यांनी श्रीअरविंदांना लिहिले की, "अधिमानसिक स्तरावरून लिहिल्या गेल्या आहेत अशा इंग्रजीमधील काही काव्यपंक्ती मला उदाहरण म्हणून द्याव्यात." श्रीअरविंदांनी त्यांना उत्तर दिले की, "इंग्रजीमध्ये कदाचित भविष्यात अशा काव्यपंक्ती लिहिल्या जातील पण आजवर तरी असे लिखाण झालेले नाही.''

पूर्वी सेठना यांच्या विनंतीवरून श्रीअरविंद यांनी त्यांना विविध वृत्तांमधील काव्यरचना तयार करून दिल्या होत्या. तेव्हा तशाच प्रकारे ""मला अधिमानसिक स्तरावरील काव्यपंक्ती लिहून द्या. फार नाहीत, अगदी सात-आठ ओळी लिहून दिल्यात तरी चालतील," अशी सेठना यांनी श्रीअरविंदांना प्रेमाने गळ घातली.

तेव्हा श्रीअरविंदांनी त्यांना लिहिले की, "वृत्तबद्ध काव्यरचना करणे तुलनेने सोपे आहे. पण, अधिमानसिक स्तरावरील काव्यनिर्मिती ही मागणी तसा पुरवठा या न्यायाने होणे शक्य नाही. मी फार फार तर एवढे करू शकतो की, 'सावित्री' या काव्यातील झालेले लिखाण तुम्हाला पाठवतो." सेठना यांची मनीषा पूर्ण होण्याची चिन्हे दिसू लागली. आणि अशा रितीने मग २५ ऑक्टोबर १९३६ या दिवशी त्यांना श्रीअरविंद लिखित सावित्री महाकाव्याचा प्रारंभीचा भाग मिळाला. ते त्या लिखाणाने अक्षरशः भारावून गेले.

पुढे मग श्रीअरविंदांनी सांगितलेले आणि निरोदबरन यांनी उतरवून घेतलेले सावित्रीचे लिखाण सेठना यांच्याकडे नियमितपणे येऊ लागले. सेठना ते लिखाण टंकलिखित करून पुन्हा श्रीअरविंदांकडे तपासण्यासाठी पाठवत असत. या निमित्ताने त्या दोघांच्या दरम्यान सावित्रीबाबत बराच पत्रव्यवहार झाला. स्वतः श्रीअरविंद हे सेठना यांच्याकडून आलेल्या सूचना विचारात घेत असत आणि सावित्री महाकाव्य 'संपूर्णपणे परिपूर्ण' असावे यासाठी प्रसंगी

मूळ लिखाणात फेरफार देखील करत असत.

सावित्री या महाकाव्याला श्रीअरविंद प्रस्तावना लिहू इच्छित होते, पण त्यांचे ते काम अपूर्ण राहून गेले, पण सावित्रीवरील श्रीअरविंद आणि सेठना यांच्यामध्ये झालेल्या या पत्रव्यवहाराच्या निमित्ताने ती उणीव भरून निघाली. सावित्री ग्रंथामध्ये हा सर्व पत्रव्यवहार समाविष्ट करण्यात आला आहे.

पुढे सेठना यांनी या ग्रंथाच्या प्रकाशनासाठी, मुद्रितशोधनासाठी अपार परिश्रम घेतले. श्रीअरविंद यांनी लिहिलेले लेखन अगदी यथातथ्यपणे, निर्दोषपणे वाचकांपर्यंत पोहोचावे यासाठी त्यांनी अक्षरशः जिवाचे रान केले.

- आधारित (Sri Aurobindo - the Poet by Amal Kiran)

*

## श्रीमाताजींनी दिलेला संदेश

सावित्री महाकाव्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या महाकाव्याचा विषय वैश्विक आहे आणि त्यात प्रकट झालेले सत्य हे भविष्यसूचक आहे. सावित्रीच्या वातावरणात व्यतीत केलेला वेळ कधीही व्यर्थ जाणार नाही.

- श्रीमाताजी (CWM 13 : 26)

*

## सावित्री महाकाव्याचे वाचन

स्वतःची बुद्धिमत्ता विकसित व्हावी आणि सखोल गोष्टी उमगाव्यात म्हणून व्यक्ती 'सावित्री' महाकाव्याचे वाचन करते.

भक्तिभाव वाढीस लागावा आणि श्रीअरविंदांचे साहाय्य लाभावे म्हणून त्यांच्या संपर्कात येण्यासाठी, व्यक्ती त्यांच्या समाधीपाशी जाऊन एकाग्र होते.

तुम्हाला या गोष्टींचे थोडेसेही मोल वाटत असेल तर, तुम्ही या गोष्टी नियमितपणे केल्या पाहिजेत; कारण अचेतनतेचा आळशीपणाच तुम्हाला या गोष्टी करण्यापासून रोखत असतो.

- श्रीमाताजी (CWM 16 : 307)

*

## सावित्री महाकाव्याचे आकलन

सावित्री ही एका दर्शनाची नोंद आहे, ती अशा एका अनुभूतीची नोंद आहे, की जी अनुभूती साधारण स्वरूपाची नाही आणि सर्वसाधारणतः मानवी मन ज्याचे दर्शन घेऊ शकते किंवा ज्याचा अनुभव घेऊ शकते त्यापासून बहुधा ही अनुभूती फार दूरची आहे. या नवीन प्रकारच्या गूढरम्य काव्याच्या आकलनासाठी चेतनेचा आणि सौंदर्यदृष्टीचा एक नवीन विस्तार होणे आवश्यक आहे.

(Persepective of Savitri, Part 01 : 300)

*

## सावित्री महाकाव्याचे रसग्रहण

'सावित्री' या महाकाव्याचे रसग्रहण करायचे तर, अशा प्रकारच्या काव्यासाठी आणि 'सावित्री'मधून अभिव्यक्त होणारी आध्यात्मिक दृष्टी पाहण्यासाठी व्यक्तीने खुले असले पाहिजे आणि डोक्याच्या वरील स्तरावरून जेव्हा स्पर्श होईल तेव्हा, तो जाणवण्याची क्षमतासुद्धा त्या व्यक्तीकडे असली पाहिजे.

(Perspectives of Savitri, Part 01 : 302)

*

## सावित्री महाकाव्याचा अनुवाद

श्रीमाताजी : 'सावित्री' हे अनुवादित न करता येण्याजोगे महाकाव्य आहे असे मला वाटते, हे मी येथे स्पष्टपणे सांगू इच्छिते आणि त्यामुळे त्याच्या अनुवादाला मी प्रोत्साहन देत नाही. अपवाद एकच, 'सावित्री' नामक जी एकमेवाद्वितीय अद्भुत गोष्ट आहे, त्यावर एकाग्रता करण्याच्या दृष्टीने व्यक्तीने वैयक्तिक अभ्यास म्हणून त्याचा अनुवाद करण्यास हरकत नाही.

- श्रीमाताजी (New Correspondences of The Mother : 510)

*

## समीक्षकांचा अभिप्राय

एक पाश्चात्त्य तत्त्वज्ञ व समीक्षक मि. रेमंड फ्रँक पायपर याने लिहिले आहे की, "श्रीअरविंदांनी निर्माण केलेले हे महाकाव्य कदाचित इंग्रजी

भाषेतील सर्वांत महान महाकाव्य असावे...

आजवर झालेल्या रचनांपैकी सर्वात जास्त सर्वसमावेशक, समग्र, सुंदर आणि परिपूर्ण वैश्विक काव्यरचना म्हणून 'सावित्री'चा उल्लेख करता येईल, असे विधान करण्याचे मी धाडस करत आहे. यामध्ये प्रतीकात्मक रितीने अगदी आदिम वैश्विक शून्यापासून, पृथ्वीच्या अंधकार आणि संघर्षातून प्रवास करत करत, अतिमानसिक आध्यात्मिक अस्तित्वाच्या उच्चतम क्षेत्रापर्यंतच्या सर्व श्रेणी आलेल्या आहेत आणि त्यामध्ये मनुष्याच्या प्रत्येक समस्येवर अतुलनीय अशा विशाल, भव्य आणि रूपकात्मक तेजस्वी श्लोकांच्या माध्यमातून प्रकाश टाकण्यात आला आहे."

(Perspectives of Savitri, Part 01 : 276-277)

*

## सावित्री आणि समस्यानिरसन

तुम्ही जर कधी निराश असाल किंवा दुःखीकष्टी असाल किंवा तुम्ही कितीही प्रयत्न केलेत तरी, तुम्ही जे काही करू पाहत आहात त्यात जर तुम्ही यशस्वी झाला नाहीत किंवा तुम्हाला ज्याची अपेक्षा आहे त्याच्यापेक्षा काहीतरी विपरीत असेच जर नेहमी घडत असेल आणि आता ते अशा एका टप्प्यापर्यंत येऊन पोहोचले असेल की जेथे तुमचा तुमच्यावरचा ताबा सुटतो, जीवन तिरस्करणीय होऊन जाते, तुम्ही दुःखीकष्टी होता तेव्हा लगेचच 'सावित्री' महाकाव्य हाती घ्या आणि एक क्षणभर चित्त एकाग्र करून, त्यातील कोणतेही एक पान उघडा आणि वाचा. तुमचे सगळे दुःख वाफेप्रमाणे विरून जात आहे, असे तुम्हाला आढळेल.

अगदी कितीही पराकोटीचे दुःख असले तरी त्यावर मात करण्याचे सामर्थ्य त्यातून तुम्हाला मिळेल. आत्तापर्यंत जे तुम्हाला त्रासदायक वाटत होते ते आता तसे वाटेनासे होईल. उलट, त्याऐवजी तुम्हाला विलक्षण आनंद जाणवू लागेल. जणू काही या जगात अशक्य असे काही नाहीच असे तुम्हाला वाटेल आणि प्रत्येक अडथळ्यावर मात करण्यासाठी आवश्यक असणारी शक्ती व ऊर्जा तुम्हाला लाभेल; तुमच्या चेतनेमध्ये पूर्णपणे पालट झालेला

असेल. सर्व गोष्टींचे शुद्धीकरण करणारा एक अक्षय आनंद तुमच्या अनुभवास येईल.

'सावित्री' महाकाव्यामधील अगदी थोड्या पंक्ती वाचल्यात तरीही त्यामुळे तुमचा तुमच्या आंतरतम अस्तित्वाशी संपर्क घडून येईल. वाचून झाल्यावर तुम्ही अगदी खूप गाढपणे एकाग्र झालात तरी, तुम्हाला भेडसावणाच्या गोष्टीवर तुम्हाला उपाय सापडेल. तुम्ही कोणताही विचार न करता, सावित्रीमधील अधलेमधले कोणतेही पान उघडा, तेथे तुम्हाला तुमच्या समस्यांचे उत्तर सापडेल. अगदी साधेसरळपणाने आणि श्रद्धेने हे केलेत तर तुम्हाला याचा परिणाम निश्चितपणे दिसून येईल.

- श्रीमाताजी (Sweet Mathar by Mana Sarkar 40-41)

**

# सावित्री महाकाव्यामधील प्रतीकात्मकता

## लेखक या भूमिकेतून श्रीअरविंद यांचे मनोगत

'सावित्री' महाकाव्याच्या प्रारंभी 'लेखकाने लिहिलेली टिप्पणी' या शीर्षकाखाली 'सावित्री'मधील प्रतीकात्मकता उलगडवून दाखविताना, श्रीअरविंद लिहितात -

महाभारतामध्ये सत्यवान आणि सावित्री यांची कथा ही दांपत्य-प्रेमाने मृत्युवर मिळविलेल्या विजयाची कहाणी म्हणून सांगितली जाते. मानवी कहाणीच्या अनेकविध वैशिष्ट्यांनी दर्शविल्याप्रमाणे, हे आख्यान म्हणजे वैदिक युगातील अनेकानेक प्रतीकात्मक आख्यायिकांपैकी एक आहे.

'सत्यवान' म्हणजे स्वतःच्या अंतरंगात दिव्य सत्य बाळगणारा आत्मा आहे पण तो मृत्यू आणि अज्ञानाच्या मगरमिठीमध्ये सापडला आहे.

'सावित्री' हा दिव्य शब्द आहे, ती सूर्याची कन्या आहे. जगाला तारण्यासाठी जी जन्माला आली आहे, अवतरली आहे अशी परम सत्याची देवता म्हणजे 'सावित्री'.

'अश्वपती' म्हणजे अश्वांचा पती, स्वामी! तपस्येचे स्वामी असलेले अश्वपती हे 'सावित्री'चे मानवी वडील आहेत. अश्वपती म्हणजे आपल्याला मर्त्यत्वाकडून अमर्त्य स्तरांप्रत उन्नत होण्यासाठी साहाय्य करणाऱ्या आध्यात्मिक प्रयासांच्या केंद्रीभूत ऊर्जेचे प्रतीक आहे.

तेजोमय यजमानांचा स्वामी असलेले 'द्युमत्सेन' हे सत्यवानाचे पिता आहेत; द्युमत्सेन हे दृष्टीचे स्वर्गीय राज्य आणि त्याद्वारे वैभवाचे राज्य गमावलेल्या आणि येथे येऊन अंध झालेल्या दिव्य मनाचे प्रतीक आहे.

असे असूनही ('सावित्री' महाकाव्य) हे केवळ एक रूपक नव्हे, किंवा त्यातील व्यक्तिरेखा म्हणजे गुणांचे मूर्तरूप नव्हे; तर त्या व्यक्तिरेखा म्हणजे आपण ज्यांच्या प्रत्यक्ष संपर्कात येऊ शकतो अशा जिवंत व चेतनायुक्त शक्तींच्या विभूती आहेत किंवा अवतार आहेत. मनुष्याला मर्त्य दशेकडून एका दिव्य चेतनेप्रत आणि अमर्त्य जीवनाप्रत जाण्याचा मार्ग दाखविण्यासाठी

आणि त्याला साहाय्य करण्यासाठी त्यांनी मानवी देह धारण केला आहे.

- श्रीअरविंद (CWSA 33-34)

*

## प्रतीकात्मक साहित्यकृती

श्रीमाताजी म्हणतात, “सावित्री म्हणजे अमुक अमुक असे असे घडले हे सांगणारे केवळ एक कथानक नाही; तर ती एक प्रतीकात्मक साहित्यकृती आहे, या जडभौतिक सृष्टीचे दिव्यत्वात रूपांतरण करण्याचा ईश्वराचा जो प्रयत्न आहे त्याचे ते संघनीकृत, चित्रात्मक रूप आहे.”

*

श्रीमाताजींनी ‘सावित्री’मधील प्रतीकात्मकता येथे सांगितली आहे. “पृथ्वीच्या निर्मितीची आणि या विश्वाला दुःखभोग व विनाशापासून वाचविण्यासाठी साधनभूत झालेल्या मनुष्याची ही एक कहाणी आहे. सत्यवानाचा मृत्यू हे पृथ्वीच्या निर्मितीच्या दुःखभोगाचे, तिच्या नियतीचे प्रतीक बनते आणि सावित्री हे पृथ्वीच्या मुक्ततेचे प्रतीक बनते. समस्येवर उपाय सुचविण्यासाठी म्हणून सावित्री मृत्युचा सामना करते. या सृष्टीने दुःखभोग, यातना आणि मृत्युमध्ये बुडी दिली आहे; परंतु या सृष्टीचे त्या दिव्य मातेच्या कृपाहस्तामुळे रक्षण होऊ शकेल आणि तिचे निश्चितपणे रक्षण होणार आहे.”

(Perspectives of Savitri, Part 01 : 310-311)

*

## दिव्य प्रकाशाची आणि ज्ञानाची देवता

इ. स. १९३९ मध्ये श्रीअरविंदांनी असे लिहिले आहे की, दांपत्य प्रेमाची कहाणी म्हणून सावित्री आख्यानाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सार्वत्रिक असला तरी, अगदी महाभारतामध्येसुद्धा ‘सावित्री’ चे कथानक हे प्रतीकात्मक म्हणूनच आलेले आहे.

त्यातील प्रतीकात्मकतेविषयी श्रीअरविंदांनी सांगितले आहे; ते असे की, ज्याच्याशी सावित्रीने विवाह केला तो सत्यवान हा मृत्युच्या साम्राज्यामध्ये उतरलेल्या आत्म्याचे प्रतीक आहे. मृत्युच्या मगरमिठीतून सत्यवानाची सुटका

करण्यासाठी आलेली दिव्य प्रकाशाची आणि ज्ञानाची देवता म्हणजे 'सावित्री'.

*

## सावित्री कथानकातील प्रतीकात्मक अर्थ

महाभारतातील वनपर्वामध्ये आलेल्या सत्यवान-सावित्रीच्या कथेला श्रीअरविंदांनी नियतीवाद आणि पुरुषार्थ यांच्यामधील एका विस्तृत संवादाचे स्वरूप दिले आहे. दृढनिश्चय आणि पुरुषार्थ या गोष्टी मृत्युवर आणि पर्यायाने नियतीवर कसा विजय मिळवितात, हे यामधून स्पष्ट होते. मानव हा परिस्थितीचा दास नसून, तो तिचा स्वामी होऊ शकतो, हा दुर्दम्य विश्वास 'सावित्री' या महाकाव्याद्वारे निर्माण होतो. समस्त मानववंशाने अमरत्वाच्या प्राप्तीसाठी केलेले प्रयत्न असे त्याचे स्वरूप आहे. अश्वपती हा मानवी जीवनाचा अधिपती आहे. आत्म्याचे स्वातंत्र्य मिळवून, दिव्य ज्ञान, शक्ती, आनंद, अमरत्व या दैवी गुणांनी जीवन परिपूर्ण करावे अशी त्याला आस लागलेली असते. आत्मज्ञान, विश्वज्ञान आणि परमेश्वरज्ञान संपादन करण्यासाठी तो विविध योगसाधना करतो. आध्यात्मिक अत्युच्च शिखरावर पोहोचल्यावर तो दिव्य विश्वमातेला आवाहन करतो की, "तू या भौतिक मर्त्य जगात अवतीर्ण हो, तरच या पृथ्वीचा उद्धार होईल."

दिव्य माता त्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून आपली दिव्य शक्ती कृपाप्रसादाने पाठविते आणि त्या कृपेनेच 'सावित्री'चा मानवी देहामध्ये जन्म होतो. सावित्री जेथे जेथे जाते, जेथे जेथे वावरते तेथे ती तिच्या दिव्य प्रभावाने वातावरण प्रकाशित करते. ती सत्यवानाची निवड करते. सत्यवान म्हणजे सत्याचे मनुष्यरूप. सत्यवान म्हणजे मर्त्य नश्वर जगामध्ये सत्याची प्रतिष्ठापना करू पाहणाऱ्या मानवाच्या विफल प्रयत्नांचे रूपच जणू, पण सावित्री म्हणजे दिव्य कृपा आहे. ती मृत्युशी म्हणजे नकाराच्या आत्यंतिक रूपाशी झगडा देते. आपल्या आत्मसामर्थ्याच्या दिव्य प्रकाशामध्ये मृत्युचा आकार विरघळवून टाकते आणि मानवजातीसाठी अमरत्व जिंकून घेते. या पृथ्वीचे दिव्य जीवनामध्ये परिवर्तन घडवून आणते.

*

## सावित्री - दिव्य मातेचा अवतार

'सावित्री' या महाकाव्यातील सावित्री ही केवळ सत्यवानाची पत्नी नसून ती दिव्य मातेचा अवतार आहे. कोणती तरी एखादी वैयक्तिक गरज पूर्ण करणे किंवा वैयक्तिक संकटावर मात करणे हे तिच्या महान प्रयत्नांचे सीमित उद्दिष्ट नसून, वैश्विक उत्क्रांतीला चालना देणे, ती अधिक वेगवान करणे हे तिचे प्राथमिक उद्दिष्ट आहे.

सत्यवानाचा मृत्यू हा काही केवळ एक वैवाहिक प्रश्न नाही तर ती पुन्हापुन्हा निर्माण होणारी मानवी समस्या आहे, ती एक वैश्विक समस्या आहे, पृथ्वीच्या उत्क्रांतीच्या इतिहासातील ते एक संकट आहे. आणि कृष्णछायेचा पराभव करण्यासाठी आणि सत्यवान नामक विश्वाच्या आत्म्याला वाचविण्यासाठी, दिव्य माता शक्ती आणि कृपा या स्वरूपात खाली अवतरली आहे.

(Perspectives of Savitri, Part 01 : 288)

*

## सावित्रीचे पृथ्वीवरील कार्य

उत्क्रांतीचे हे जे परिश्रम घेतले जात आहेत त्याचे पृथ्वी हे एक प्रातिनिधिक आणि प्रतीकात्मक जगत आहे; ते एक प्रकारचे स्फटिकीकरण, एक प्रकारचे केंद्रीकरण आहे. ती अधिक सघन अशी वास्तविकता आहे. पृथ्वीचा इतिहास हा प्रतीकात्मक इतिहास आहे या दृष्टीने त्याकडे पाहिले पाहिजे. या पृथ्वीवरच ईश्वराचे अवतरण घडून येते. (हा विश्वाचा इतिहास नाही तर, हा पार्थिव निर्मितीचा इतिहास आहे.) हे अवतरण पार्थिव व्यक्तीमध्ये, व्यक्तिगत अशा पार्थिव वातावरणामध्ये घडून येते. विश्वमाता ही विश्वामध्ये उपस्थित आहे आणि विश्वामध्ये ती कार्यरत आहे पण उत्क्रांती पूर्णत्वास नेण्याचे तिचे जे उद्दिष्ट आहे ते साध्य करण्याचे सारे कार्य या पृथ्वीवरच मूर्त रूपात आकाराला यावयाचे आहे; 'सावित्री' मध्ये हे अगदी सुस्पष्टपणे मांडण्यात आले आहे.

ईश्वराच्या अवतरणासाठी पृथ्वीची तयारी व्हावी म्हणून तिला साहाय्य

करण्यासाठी, या विश्वमातेची प्रतिनिधी म्हणता येईल अशा प्रकारची एक विभूती, सुरुवातीला सदोदित या पृथ्वीवर उपस्थित असते. जेव्हा पृथ्वीची सिद्धता होईल, तेव्हा ती विश्वमाता हे कार्य पूर्णत्वाला नेण्यासाठी स्वतः या पृथ्वीवर अवतरित होईल आणि हेच तिने सत्यवानाबाबत केले आहे.

सत्यवान हा पृथ्वीचा आत्मा आहे. सावित्री ही या पृथ्वीच्या आत्म्यासोबत अगदी एकत्वाने राहत आहे आणि ते दोघं मिळून हे कार्य करत आहेत. 'मी इथेच माझे कार्य करेन,' असे म्हणत, सावित्रीने तिच्या कार्यासाठी पृथ्वीच्या आत्म्याची निवड केली आहे. (येथे श्रीमाताजी उच्चतर चेतनेच्या प्रांतांकडे निर्देश करत म्हणतात की,) इतरत्र केवळ 'असणे' पुरे असते आणि तेथे गोष्टी नुसत्या 'असतात'. पण पृथ्वीवर मात्र तुम्हाला कार्य 'करावे' लागते. त्याचे अर्थातच प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे वैश्विक परिणाम होतात; पण गोष्टी इथेच कराव्या लागतात, कार्य करण्याचे स्थान हे 'इथेच' आहे.

तेव्हा सावित्री स्वत:च्या रमणीय अशा वैश्विक आणि विश्वातीत स्थितीमध्ये किंवा कालातीत आणि विश्वातीत शाश्वततेमध्ये निवास करण्याऐवजी म्हणते, "नाही, मी या इथेच, पृथ्वीवरच माझे कार्य करणार आहे, इथेच कार्य करणे मला पसंत आहे."

तेव्हा परमेश्वर तिला म्हणतो, "तू व्यक्त केलास तो माझाच संकल्प आहे." तो म्हणतो, "मला येथे कार्य करायचे आहे आणि जेव्हा सर्व काही सिद्ध होईल, जेव्हा पृथ्वी सिद्ध होईल, जेव्हा मानवजात सिद्ध होईल (जरी कोणालाही ते जाणवले नाही तरी) जेव्हा ती दिव्य घटिका येईल, तेव्हा मी माझे कार्य पूर्ण करण्यासाठी स्वतः अवतार घेईन." अशी आहे ही कहाणी!

- श्रीमाताजी (Conversation with a desciple)

**

# श्रीमाताजी सावित्री महाकाव्याविषयी

## ‘सावित्री’ महाकाव्याची थोरवी

‘सावित्री’ अद्भुत आहे, श्रीअरविंदांनी सारे काही, अगदी सारे सारे आधीच पाहिलेले होते. प्रत्येक गोष्ट, अगदी एक न् एक गोष्ट त्यांनी आधीच पाहिलेली आहे, असा एखादाही मुद्दा शिल्लक राहिला नाहीये की ज्याचा त्यांनी धांडोळा घेतलेला नाहीये.

- श्रीमाताजी (Conversation with a Disciple, April 20, 1963)

*

‘सावित्री’ महाकाव्याचे लिखाण हे पूर्णतः इतर कोणत्या तरी, उच्चस्तरीय प्रांतामधून झालेले आहे. ज्याविषयी बोलावे अशी सर्वांत महत्त्वाची गोष्ट जर कुठली असेल तर, ती ‘सावित्री’ आहे, असे मला वाटते.

*

श्रीअरविंदांच्या दृष्टीचे परमोच्च प्रकटीकरण म्हणजे ‘सावित्री’ हा ग्रंथ.

- श्रीमाताजी (CWM 13 : 24)

*

## श्रीमाताजी सावित्रीविषयी...

**सावित्रीचे आकलन**

तुम्हाला ‘सावित्री’ महाकाव्य उमगते की नाही, समजते की नाही यामुळे फारसा काही फरक पडत नाही; सावित्रीचे वाचन नेहमी करत राहा. जेव्हा जेव्हा तुम्ही सावित्रीचे वाचन कराल त्या प्रत्येक वेळी तुम्हाला त्यातून काहीतरी नवीन उमगते आहे, असे आढळून येईल. प्रत्येक वेळी तुम्हाला एक नवीनच दर्शन घडेल, प्रत्येक वेळी एक नवीनच अनुभव तुम्हाला येईल, ज्या गोष्टी आधी तिथे नव्हत्या किंवा तुम्हाला ज्या गोष्टी आधी समजल्या नव्हत्या, त्या गोष्टी उदयाला येतील आणि अचानकपणे साऱ्या गोष्टी सुस्पष्ट होतील.

सावित्रीच्या शब्दांच्या किंवा काव्यपंक्तींच्या माध्यमातून, नेहमीच एक अनपेक्षित दृष्टी उदयाला येते. जेव्हा जेव्हा तुम्ही सावित्रीचे वाचन कराल

आणि समजून घेण्याचा प्रयत्न कराल, त्या प्रत्येक वेळी, त्यामध्ये कोणत्यातरी गोष्टीची भर घातली गेलेली आहे, असे तुम्हाला आढळेल. जे सुप्त होते त्याचे अगदी स्पष्टपणे आणि तपशिलवार प्रकटन झाले आहे, असे तुम्हाला जाणवेल. ज्या काव्यपंक्तीचे तुम्ही आधी एकदा वाचन केले होते त्याच जेव्हा तुम्ही पुन्हा वाचाल, तेव्हा त्या प्रत्येक पुनर्वाचनाच्या वेळी त्याच काव्यपंक्ती एका वेगळ्या प्रकाशात तुमच्यासमोर प्रकट होतील. हे असे अगदी नेहमी घडून येते. नेहमीच तुमचा अनुभव अधिकाधिक समृद्ध होत जातो, प्रत्येक टप्प्यावर घडून आलेला तो एक साक्षात्कार असतो.

परंतु अवांतर पुस्तकं किंवा वर्तमानपत्रं वाचल्याप्रमाणे तुम्ही सावित्रीचे वाचन करता कामा नये. तुम्ही सावित्रीचे वाचन रिक्त डोक्याने केले पाहिजे, मनाची पाटी कोरी करून वाचन केले पाहिजे, म्हणजे मनामध्ये इतर कोणतेही विचार असता कामा नयेत; तुम्ही लक्ष एकाग्र केले पाहिजे आणि रिक्त, स्थिरचित्त व खुले राहिले पाहिजे; असे केलेत तर सावित्रीमधील शब्द, लय, स्पंदने या पांढऱ्या कागदावर थेटपणे उतरतील आणि तुमच्या मेंदूवर त्याचा ठसा उमटवतील आणि सावित्रीमधील ते शब्द, ती लय, ती स्पंदने स्वतःहूनच तुम्हाला त्यांचा अर्थ उलगडवून दाखवतील आणि त्यानंतर अगदी विनासायास तुम्हाला त्यांचा अर्थ स्पष्ट होईल.

**सावित्रीचे साहाय्य**

तुम्हाला (अध्यात्माच्या) सर्वोच्च शिखरापर्यंत नेण्यासाठी 'सावित्री' हे महाकाव्यच पुरेसे आहे. त्यावर ध्यान कसे करायचे हे जर एखाद्या व्यक्तीला खऱ्या अर्थाने माहीत असेल तर, आवश्यक असणारे सर्व प्रकारचे साहाय्य त्या व्यक्तीला सावित्रीमधून मिळेल. त्या व्यक्तीला जर खरोखरच पूर्णयोगाच्या या मार्गाचे अनुसरण करण्याची इच्छा असेल तर, सावित्री हे महाकाव्य म्हणजे जणू एक दृग्गोचर (visible) असे साहाय्य आहे; जणू काही ईश्वर स्वतःच त्या व्यक्तीस हाताला धरून चालवितो आणि निर्धारित उद्दिष्टाप्रत घेऊन जातो. आणि मग एखादा प्रश्न, मग तो कितीही वैयक्तिक असला तरी, त्या प्रश्नाचे उत्तर त्यामध्ये सापडते, प्रत्येक समस्येचे त्यामध्ये निरसन होते. खरोखरच

व्यक्तीला योगसाधना करण्यासाठी आवश्यक असणारी प्रत्येक गोष्ट त्यामध्ये मिळते. "जणू काही श्रीअरविंदांनी समग्र विश्वच या एका ग्रंथामध्ये सामावून घेतले आहे." हे एक अद्भुत कार्य आहे, ते भव्य आहे आणि ज्याची तुलनाच होऊ शकणार नाही अशा अद्वितीय पूर्णत्वाने घडलेले हे कार्य आहे.

**सावित्री - एक साहस**

सावित्रीच्या लिखाणापूर्वी एकदा श्रीअरविंद मला म्हणाले, "एका नवीन साहसाला आरंभ करण्यासाठी मला प्रवृत्त केले जात आहे. सुरुवातीला मी संकोच बाळगत होतो, पण आता मी निर्णय घेतला आहे. तरीसुद्धा, यामध्ये मी कितपत यशस्वी होईन हे मला माहीत नाही. पण त्यासाठी साहाय्य मिळावे म्हणून मी प्रार्थना करत आहे." ही गोष्ट लिखाण सुरू करायच्या आधीची आहे. त्यांचे बोलणे ईश्वरी विनम्रतेने आणि सौजन्याने भरलेले असे. श्रीअरविंदांच्या बोलण्याची पद्धतच तशी होती; त्यांनी कधीच स्वतःला महत्त्व दिले नाही.

ज्या दिवशी त्यांनी प्रत्यक्ष लेखनास प्रारंभ केला तेव्हा ते मला म्हणाले, "सुकाणू नसलेल्या नावेत बसून, मी स्वतःला अनंताच्या विशालतेमध्ये झोकून दिले आहे." लेखनास एकदा सुरुवात झाल्यानंतर मात्र ते पानांमागून पाने अविरतपणे लिहीत गेले, जणू काही ते लेखन आधीच अवकाशात वर कोठेतरी पूर्ण झालेले होते आणि त्यांना ते या पानांवर लेखणीच्या साहाय्याने फक्त उतरवून काढायचे होते. खरे सांगायचे तर, सावित्रीची पूर्ण रचनाच उच्चतर प्रांतामधून, 'एकसंधपणे' अवतरली आहे आणि श्रीअरविंदांनी त्यांच्या अलौकिक प्रतिभेच्या आधारे, अगदी दिमाखदार आणि भव्य शैलीच्या माध्यमातून, त्यातील काव्यंपक्तींची मांडणी केली आहे. कधीकधी तर ओळीमागून ओळी त्यांच्यासमोर सुस्पष्टपणे प्रकट झाल्या आहेत आणि त्यांनी त्या जशाच्या तशा उतरवून घेतल्या आहेत. शक्यतेच्या सर्वोच्च शिखरावरून प्रेरणा यावी म्हणून त्यांनी अथकपणे, अविरतपणे परिश्रम घेतले आहेत. त्यांनी केवढे महान कार्य केले आहे!

'सावित्री' ही खरंच, स्वयमेव एक सत्य निर्मिती आहे. या कार्याची इतर कशाबरोबर तुलनाच होऊ शकत नाही. त्यामध्ये प्रत्येक गोष्ट आहे आणि

त्या गोष्टी त्यामध्ये अतिशय साध्यासोप्या व सुस्पष्ट रूपात मांडल्या आहेत. त्यातील वचने ही अगदी पूर्णतया सुसंवादी, पारदर्शी आणि शाश्वत सत्य आहेत.

**अद्वितीय सावित्री**

आजवर मी प्रचंड वाचन केले आहे, पण 'सावित्री' बरोबर तुलना होऊ शकेल अशी एकही साहित्यकृती मला आढळलेली नाही. ग्रीक, लॅटिन, इंग्रजी आणि अर्थातच फ्रेंच साहित्यामधील उत्तमोत्तम साहित्यकृती मी अभ्यासलेल्या आहेत, जर्मन भाषेतील साहित्यकृतीसुद्धा मी वाचल्या आहेत; इतकेच नव्हे तर पाश्चात्त्य आणि पौर्वात्य देशांमधील महाकाव्यांसहित, उत्तमोत्तम असे सर्व साहित्य मी अभ्यासले आहे.

पण मी पुन्हा सांगते की, 'सावित्री'च्या तोडीचे साहित्य मला कुठेच कधीच आढळलेले नाही. काही अगदी मोजक्या साहित्यकृतींचा अपवाद वगळता, 'सावित्री' व्यतिरिक्त इतर साहित्यकृती मला अगदी पोकळ, सपाट, रित्यारित्या वाटल्या, त्यांमध्ये कोणताही तथ्यांशच नव्हता. आणि त्या मोजक्या साहित्यकृतीसुद्धा सावित्रीच्या तुलनेत अगदी एखादा अंशभागच आहेत असे म्हणावे लागेल. 'सावित्री'ची भव्यता, तिची विशालता, त्यामधील सत्य यांविषयी काय वर्णावे ? श्रीअरविंदांनी खरोखरच अजरामर आणि चिरंतन असे साहित्य निर्माण केले आहे. मी पुन्हा एकदा सांगते की, सावित्रीसारखे महाकाव्य अन्यत्र कोठेही आढळणार नाही.

एखाद्या व्यक्तीने अगदी त्यातील सत्यतेची दृष्टी जरी बाजूला ठेवली - वास्तविक, ती दृष्टी हाच त्यातील प्रेरणेचा गाभा आहे, तेच त्याचे मूलद्रव्य आहे; पण ती दृष्टी बाजूला ठेवून जरी फक्त त्यातील केवळ काव्यपंक्तींचाच विचार केला तरी, त्यासुद्धा एकमेवाद्‌द्वितीय म्हणाव्यात अशाच असल्याचे त्या व्यक्तीला आढळेल. अभिजात साहित्यकृतींमधील सर्वोच्च अशा त्या पंक्ती आहेत, असे त्या व्यक्तीच्या लक्षात येईल. मनुष्य ज्याची कल्पनाही करू शकणार नाही अशी ही श्रीअरविंदांची निर्मिती आहे. कारण त्यामध्ये सारे काही आहे, सारे सारे आहे.

**सावित्री ग्रंथ - अमर्त्यत्वाचा मार्गदर्शक**

'सावित्री' महाकाव्य म्हणजे एक साक्षात्कार आहे, तेच ध्यान आहे, 'सावित्री' हा अनंताचा, शाश्वताचा शोध आहे, असे म्हणता येईल.

'सावित्री' हे महाकाव्य जर अमर्त्यत्वाची आस बाळगून वाचले तर, सावित्रीचे वाचन हेच स्वयमेव अमर्त्यतेचे मार्गदर्शक म्हणून उपयोगी ठरेल. सावित्रीचे वाचन करणे म्हणजे खरेतर योगसाधना करण्यासारखेच आहे, आध्यात्मिक ध्यान करण्यासारखे आहे; ईश्वराचा साक्षात्कार होण्यासाठी जे जे काही आवश्यक असते ते ते सारे व्यक्तीला यामध्ये आढळणार आहे.

येथे पूर्णयोगाच्या प्रत्येक टप्प्याची नोंद करण्यात आलेली आहे. एवढेच नव्हे तर, इतर सर्व योगांमधील रहस्यांचीसुद्धा येथे नोंद आहे. यातल्या प्रत्येक वचनामध्ये जे प्रकटीकरण झाले आहे त्याचे एखाद्या व्यक्तीने जर खरोखरच प्रामाणिकपणे अनुसरण केले तर, ती व्यक्ती अंतिमतः अतिमानसिक योगातील रूपांतरण प्रक्रियेपर्यंत येऊन पोहोचेल. सावित्री हे महाकाव्य म्हणजे असा एक अचूक मार्गदर्शक आहे की जो तुमची साथसंगत कधीही सोडत नाही. जो कोणी या योगमार्गाचे अनुसरण करू इच्छितो, त्याला नेहमीच सावित्रीचे साहाय्य उपलब्ध असते.

**सावित्री - सत्यशोधनाची गुरुकिल्ली**

'सावित्री' मधील एकेक वचन हे एखाद्या प्रकट मंत्रासारखे आहे. आजवर ज्ञानाच्या मार्गाने मानवाने जे जे काही प्राप्त करून घेतले आहे त्याच्या पलीकडे जाणारे असे यातील एकेक वचन आहे. यातील शब्दांचे प्रकटीकरण व रचना अशा पद्धतीने केली आहे की, त्याच्या लयीची नादात्मकता तुम्हाला ध्वनीच्या उगमापाशी म्हणजे ॐकारापाशी घेऊन जाते, हे मी पुन्हा एकदा सांगते.

होय, सारे काही त्यामध्ये आहे त्यामध्ये पारलौकिक गुह्यज्ञान आहे, गूढशक्तिवाद आहे, तत्त्वज्ञान आहे, उत्क्रांतीचा इतिहास आहे; त्यामध्ये मानवाचा, देवांचा, निर्मितीचा आणि प्रकृतीचा इतिहास आहे. या विश्वाची निर्मिती कशी झाली, का झाली, त्याचे प्रयोजन काय होते, त्याचे भवितव्य

काय असणार आहे, हे सारे सारे त्यामध्ये ग्रथित केलेले आहे. तुम्हाला त्यामध्ये तुमच्या साऱ्या प्रश्नांची उत्तरे मिळू शकतात. त्यामध्ये प्रत्येक गोष्टीचे अगदी खुलासेवार स्पष्टीकरण करण्यात आले आहे. जे आजवर कोणालाही ज्ञात नव्हते, असे मानवाचे आणि उत्क्रांतीचे भवितव्यसुद्धा त्यामध्ये उलगडवून दाखविण्यात आले आहे. श्रीअरविंदांनी ते इतक्या सुंदर आणि सुस्पष्ट शब्दांमध्ये मांडले आहे की, जेणेकरून, या विश्वाचे रहस्य उलगडू इच्छिणाऱ्या, आध्यात्मिक साहसवीरांना ते रहस्य अधिक सुलभतेने आकलन होईल. परंतु हे रहस्य त्यातील ओळींच्या मागे दडलेले आहे आणि ते रहस्य शोधून काढायचे असेल तर, व्यक्तीने खऱ्या चेतनेच्या आवश्यक त्या स्तराप्रत उन्नत होणे आवश्यक आहे.

सारी भाकितं, जे आगमनाच्या उंबरठ्यावर आहे त्या सर्व गोष्टींचे येथे अगदी अचूकपणे आणि अद्भुतरित्या सुस्पष्टपणे सादरीकरण करण्यात आलेले आहे. श्रीअरविंद येथे सत्यशोधनाची, चेतनेच्या शोधाची आणि हे विश्व काय आहे या समस्येचे निराकरण करण्याची एक गुरुकिल्लीच तुमच्या हाती देतात.

**सावित्री महाकाव्य - पूर्णयोगाचा सांगाती**

श्रीअरविंदांनी अचेतनतेचा दरवाजा कसा उघडला, एवढेच नव्हे तर, चेतनेचा प्रकाश अचेतनतेमध्ये खोलवर शिरून, तिचे रूपांतरण तो कसे घडवून आणू शकेल त्याचासुद्धा निर्देश श्रीअरविंदांनी केला आहे. स्वतःला अज्ञानापासून कसे मुक्त करावे आणि अतिचेतनेमध्ये उन्नत कसे व्हावे, याचा मार्ग त्यांनी दाखविला आहे; त्यांनी चेतनेचा प्रत्येक टप्पा दाखविला आहे, त्याचे मोजमाप कसे करता येऊ शकेल; इतकेच नव्हे तर, एखादी व्यक्ती मृत्युचा अडसर ओलांडून पलीकडे कशी जाऊ शकते आणि अमर्त्यत्व कसे प्राप्त करून घेऊ शकते, याचा मार्गदेखील त्यांनी दाखविला आहे. यामध्ये संपूर्ण प्रवासाचे तपशिलवार वर्णन तुम्हाला आढळेल आणि जसजसे तुम्ही अधिकाधिक पुढे वाटचाल कराल, तसतशा मानवाला आजवर सर्वथा अज्ञात असलेल्या गोष्टीसुद्धा तुम्हाला गवसू लागतील. हे सारे म्हणजे 'सावित्री'!

आणि अजूनही कितीतरी अधिक असे त्या ग्रंथामध्ये आहे.

'सावित्री'चे वाचन ही खरोखर एक अनुभूती आहे. मानवाला आजवर गवसलेली रहस्यं, त्याने उघड केलेली रहस्यं, तसेच भविष्यामध्ये त्याच्यासाठी खोळंबून असलेली रहस्यं, अशी सारी सारी रहस्यं या महाकाव्याच्या खोलात शिरल्यावर तुम्हाला आढळतील. परंतु व्यक्तीला हे सारे कसे शोधायचे याचे ज्ञान अवगत असले पाहिजे. चेतनेच्या स्तरांचा अनुभव, अतिमानसाचा अनुभव, एवढेच काय पण मृत्युवर विजय मिळविण्याचा अनुभवही त्याच्या गाठीशी असला पाहिजे. पूर्णयोगामध्ये पूर्णत्वाने प्रगत होता यावे या दृष्टीने श्रीअरविंदांनी यामध्ये प्रत्येक टप्प्याची, प्रत्येक पायरीची नोंद केली आहे.

**स्वानुभवाधारित महाकाव्य - सावित्री**

हा सारा श्रीअरविंदांचा स्वानुभव आहे आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे तोच माझा स्वतःचाही अनुभव आहे. एक प्रकारे त्यांनी माझ्याकडून घडलेल्या साधनेचेच वर्णन 'सावित्री'मध्ये केले आहे. यामधील प्रत्येक वस्तू, प्रत्येक घटना, प्रत्येक साक्षात्कार, सर्व वर्णनं, एवढेच काय अगदी रंगसंगतीसुद्धा मी जशी पाहिली होती तशीच आहे; यातील शब्द आणि वाक्प्रचारसुद्धा मी जसे ऐकले होते तंतोतंत, अगदी तसेच उतरले आहेत. आणि हे सारे, मी 'सावित्री' वाचण्यापूर्वी घडून आलेले होते. नंतर मी 'सावित्री'चे वाचन अनेक वेळा केले. पूर्वी जेव्हा श्रीअरविंद हे लिखाण करत असत तेव्हा मला ते वाचून दाखवीत असत.

रोज सकाळी ते मला 'सावित्री' वाचून दाखवीत असत. रात्रीच्या प्रहरी ते लिखाण करत असत आणि सकाळी मला वाचून दाखवीत असत. तेव्हा मला एक आश्चर्यकारक गोष्ट आढळून आली. ती अशी की, रोजच्या रोज सकाळी जे जे अनुभव ते मला वाचून दाखवीत असत, आदल्या रात्री अगदी शब्दशः तसेच अनुभव मला आलेले असत. हो, सर्व वर्णनं, सर्व रंगसंगती, सर्व चित्रं अगदी मी जशी पाहिली होती तशीच, शब्द मी ऐकले होते तसेच, सारे सारे, जे मी ऐकले होते तेच त्यांनी काव्यामध्ये, या अद्भुत काव्यरचनेमध्ये उतरविलेले असे. हो, आदल्या रात्री जे अनुभव मला आलेले असत, अगदी

तंतोतंत तेच अनुभव दुसऱ्या दिवशी सकाळी ते मला वाचून दाखवीत असत. आणि हे काही एखाद्या दिवशी योगायोगाने घडून आलेले नव्हते, तर कित्येक दिवस हे असेच चालू होते. प्रत्येक वेळी ते जे काही सांगत असत त्याची पडताळणी मी माझ्या अनुभवांशी करून पाहत असे आणि ते अनुभव नेहमीच सारखे असत. मी परत एकदा सांगते की, मी त्यांना माझे अनुभव कथन करत असे आणि मग श्रीअरविंद त्या अनुभवांच्या नोंदी करत असत, असे नव्हते; तर मी जे काही पाहिलेले असे ते त्यांना अगोदरपासूनच माहीत असे. जणू काही मला येणारे अनुभवच त्यांनी अगदी विस्तारपूर्वक अभिव्यक्त केलेले असत; अर्थातच ते त्यांचे स्वतःचेदेखील अनुभव असत.

खरे सांगायचे तर, अज्ञातामधील किंबहुना, अतिमानसामधील आमच्या एकत्रित साहसाचे सावित्री हे जणू प्रतिबिंबच आहे. हे त्यांनी स्वतः घेतलेले अनुभव आहेत, या त्यांनी अनुभवलेल्या वास्तविकता आहेत, पारलौकिक सत्यं आहेत. एखादी व्यक्ती ज्याप्रमाणे भौतिकरित्या आनंदाचा किंवा दुःखाचा अनुभव घेते, त्याप्रमाणे त्यांनी हे सारे अनुभव घेतलेले आहेत.

**सावित्री - रूपांतरणाचा समग्र योग**

सार्वभौम विपुलतेमध्ये मोकळा श्वास घेता यावा आणि परम आनंदामध्ये प्रवेश करता यावा यासाठी श्रीअरविंदांनी अचेतनाच्या घनांधकारात मार्गक्रमण केले आहे, मृत्युला आपला सोबती बनवून त्यांनी वाटचाल केली आहे. विनाशाचे दुःखही त्यांनी सहन केले आहे आणि त्या चिखलामधून, जगाच्या दुःखामधून ते बाहेर पडले आहेत. हे सारे प्रांत त्यांनी पार केले, त्याच्या परिणामांना तोंड दिले आणि व्यक्ती ज्याची कल्पनाही करू शकणार नाही अशा गोष्टी अगदी शारीरिक दृष्ट्यादेखील त्यांनी सहन केल्या आणि त्यामध्ये ते अविचल राहिले. त्यांच्याइतके दुःखभोग आजवर कोणीही सहन केलेले नाहीत. दुःखभोगाचे रूपांतर पुरुषोत्तमाच्या ऐक्यानंदामध्ये करण्यासाठी त्यांनी दुःखभोगांचा स्वीकार केला. जगाच्या इतिहासामध्ये ही एकमेवाद्द्वितीय आणि अतुलनीय अशी गोष्ट आहे. आजवर हे असे कधीही घडून आलेले नाही. आपल्याला अतिमानसाप्रत अगदी खात्रीपूर्वक वाटचाल

करता यावी म्हणून, अज्ञाताचा मार्ग पादाक्रांत करणारे ते पहिलेच आहेत. आपल्या सर्वांचे काम श्री अरविंदांनी सोपे केले आहे. 'सावित्री' म्हणजे त्यांचा रूपांतरणाचा समग्र योग आहे आणि हा योग आता पृथ्वी-चेतनेमध्ये प्रथमच दिसून येत आहे.

**सावित्री - भविष्यकालीन महाकाव्य**

मला असे वाटते की, मानव अजून या योगाचा स्वीकार करण्यास सिद्ध झालेला नाही. त्याच्यासाठी हा योग खूपच उच्च आणि खूपच विशाल आहे. मानवाला त्याचे आकलन होऊ शकत नाही, ते त्याच्या आवाक्यात येत नाही कारण सावित्रीचे आकलन हे मनाच्या माध्यमातून करायचे नसते. सावित्रीचे आकलन होण्यासाठी आणि आत्मसात करण्यासाठी व्यक्तीला आध्यात्मिक अनुभूती आलेली असणे आवश्यक आहे. व्यक्ती या योगमार्गावर जसजशी अधिकाधिक प्रगत होत जाते, तसतशी ती अधिकाधिक चांगल्या रितीने 'सावित्री' महाकाव्य आत्मसात करू शकते.

ही अशी एक गोष्ट आहे की जिची खरी कदर भावी काळातच केली जाईल. श्रीअरविंदांनी 'द फ्युचर पोएट्री' या कवितेमध्ये ज्याचा उल्लेख केला आहे त्या प्रकारचे हे भविष्यकालीन काव्य आहे. ते अगदी सूक्ष्म, अगदी विशुद्ध असे आहे. मनामध्ये किंवा मनाच्या माध्यमातून 'सावित्री'चा साक्षात्कार होणार नाही, तर ध्यानामध्येच 'सावित्री' प्रकट होते.

व्हर्जिल किंवा होमर यांच्या साहित्यकृतीशी 'सावित्री' ची तुलना करून, या महाकाव्याला स्फूर्तीच्या बाबतीत कमी लेखण्याचे दुःसाहस माणसं करतात. त्यांना त्याचे आकलन होत नाही आणि ते होणारही नाही. त्यांना काय माहीत? ते काहीच जाणत नाहीत. आणि त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न करणेही व्यर्थ आहे. त्यामध्ये काय आहे हे माणसांना ज्ञात होईल पण ते दूरवरच्या भविष्यात! नूतन चेतना प्राप्त झालेल्या नवीन वंशालाच त्याचे आकलन होणे शक्य आहे. मी खात्रीपूर्वक सांगते की, या खुल्या आकाशाखाली 'सावित्री' महाकाव्याशी ज्याची बरोबरी होऊ शकेल अशी कोणतीही साहित्यकृती नाही.

‘सावित्री’ हे रहस्यांचे रहस्य आहे. ते परम महाकाव्य आहे, ते परम-साहित्य आहे, ते परम-काव्य आहे, ती परम-दृष्टी आहे. श्रीअरविंदांनी लिहिलेल्या काव्यपंक्तीच्या संख्येचा (सुमारे २४०००) जरी विचार केला तरी लक्षात येईल की, ते परम-कार्य आहे. ‘सावित्री’चे वर्णन करण्यासाठी मानवी शब्द पुरेसे नाहीत. त्याचे वर्णन करण्यासाठी व्यक्तीला सर्वोच्च श्रेणीचा किंवा अत्युक्तीचाच वापर करावा लागतो; कारण ते महा-महाकाव्य आहे. खरोखरच ‘सावित्री’ काय आहे हे सांगण्यासाठी शब्द अपुरे आहेत. ते सांगण्यासाठी चपखल विशेषणेच नाहीत, निदान मला तरी त्यासाठी शब्द सापडले नाहीत.

‘सावित्री’चे मोल प्रचंड आहे. त्यास आध्यात्मिक मूल्य आहे, इतरही सगळी मूल्यं आहेत. विषयाच्या दृष्टीने हे महाकाव्य शाश्वत आहे, त्याचे आवाहन हे अनंत आहे, त्याची पद्धती आणि कार्य करण्याची शक्ती अद्भुत आहे. ती एकमेवाद्वितीय गोष्ट आहे, तुम्ही जितके या महाकाव्याच्या अधिक संपर्कात याल तेवढे तुम्ही अधिकाधिक उन्नत व्हाल आणि खरोखरच हे अद्भुत आहे. श्रीअरविंदांनी मनुष्याला देऊन ठेवलेली ही सर्वाधिक सुंदर गोष्ट आहे, शक्य अशी सर्वोच्च गोष्ट आहे. काय आहे ती ? मनुष्याला ती कधी ज्ञात होईल? तो सत्याचे जीवन जगायला कधी सुरुवात करणार आहे? यामध्ये उद्धृत केलेल्या गोष्टी तो स्वतःच्या जीवनात कधी अमलात आणणार आहे? हे जाणणे अजून बाकी आहे.

**आत्मज्योतीची जागृती**

तुम्ही आता दररोज ‘सावित्री’ चे वाचन करण्याचे ठरविले आहे तर योग्य रितीने, योग्य दृष्टिकोन ठेवून वाचन करा. पानं उघडण्यापूर्वी काही क्षण चित्त एकाग्र करा आणि मन होता होईल तितके रिते करा, एकही विचार मनात येता कामा नये. ‘सावित्री’पर्यंत पोहोचायचे असेल तर तो मार्ग अंतःकरणातून जातो.

मी तुम्हाला सांगते, तुम्ही खरोखर या ओढीने जर एकाग्र झालात तर तुम्ही ती ज्योत, चैत्य ज्योत, शुद्धीकरणाची ज्योत अगदी अल्प काळात,

कदाचित अगदी काही दिवसांमध्येसुद्धा प्रज्वलित करू शकाल. साधारणपणे एरवी तुम्ही जे करू शकणार नाही ते तुम्ही सावित्रीच्या साहाय्याने करू शकाल.

प्रयत्न करा. जणू काही श्रीअरविंदांना तुम्ही अर्पण करत आहात, या वृत्तीने तुम्ही ते वाचलेत, तुमच्या चेतनेमध्ये ही गोष्ट ठेवून तुम्ही त्याचे वाचन केलेत तर मग तुमच्या लक्षात येईल की, केवढे वेगळे आहे ते, किती नूतन आहे !

**मार्गदर्शक सावित्री**

तुम्हाला माहीत आहे, हे काव्य किती भारलेले आहे ते, चेतनेने पूर्णपणे भारलेले आहे! जणू काही सावित्री म्हणजे एखादं खरंखुरं मार्गदर्शक व्यक्तित्व आहे. मी तुम्हाला सांगते, ज्या कोणाला योगसाधना करण्याची इच्छा आहे, ज्याला ती निकड जाणवते आणि जो कोणी त्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करतो, त्याला 'सावित्री'च्या साहाय्याने योगाच्या शिडीवरील सर्वांत वरच्या पायरीपर्यंत पोहोचणे शक्य आहे; तो ही साधना कोठेही करू शकेल. सावित्री ज्याचे प्रतिनिधित्व करते ते रहस्य त्याला उमगणे शक्य आहे आणि ते सुद्धा कोणत्याही गुरुच्या साहाय्याविना!

'सावित्री' हे महाकाव्यच त्याच्यासाठी एकमेव मार्गदर्शक असेल, कारण त्याला ज्या ज्या कोणत्या गोष्टीची गरज पडेल ती गोष्ट त्याला 'सावित्री'मध्येच मिळेल. एखादी अडचण आली असताना किंवा पुढे जाण्यासाठी नेमके कोणत्या दिशेला वळावे हे जर त्याला कळत नसेल किंवा अडथळ्यांवर मात कशी करायची हे जर लक्षात येत नसेल तर, जर अशा प्रत्येक विधा मनःस्थितीच्या वेळी, अनिश्चिततेच्या वेळी, जी परिस्थिती आपल्याला हेलपाटून टाकते अशा प्रत्येक क्षणाला, तो काही काळ अगदी शांतचित्त राहिला तर, आवश्यक त्या सूचना, आवश्यक असणारी अगदी भरभक्कम अशी मदत त्याला मिळू शकते. तो जर अगदी अविचल आणि खुला राहू शकला आणि त्याने अगदी प्रामाणिकपणे आस बाळगली तर, जणू काही आपल्याला कोणीतरी हाताला धरून चालवीत आहे, असा अनुभव त्याला नेहमीच येत राहील. त्याच्याकडे जर श्रद्धा असेल, आत्मसमर्पण

करण्याची इच्छा असेल आणि आवश्यक तो प्रामाणिकपणा असेल तर तो अंतिम ध्येयापर्यंत निश्चितपणे पोहोचेल.

खरोखरच, 'सावित्री' म्हणजे सघन, जिवंत, चेतनेने ओतप्रोत भरलेले असे, परिपूर्ण काहीतरी आहे; सर्व मानवी तत्त्वज्ञानांच्या आणि धर्मांच्या अतीत असणारे 'सावित्री' हे महाकाव्य म्हणजे परमज्ञान आहे. 'सावित्री' हे महाकाव्य म्हणजे आध्यात्मिक मार्ग आहे, योग आहे, तपस्या आहे, साधना आहे, सारे काही त्यामध्येच सामावलेले आहे.

'सावित्री'मध्ये असामान्य शक्ती आहे आणि जो कोणी त्यातून प्रस्फुरित होणाऱ्या स्पंदनांचे ग्रहण करू शकेल, त्याच्यासाठी 'सावित्री'मधून चेतनेच्या प्रत्येक अवस्थेची खरीखुरी स्पंदने प्रस्फुरित होतात.

'सावित्री' अतुलनीय आहे, 'सावित्री' म्हणजे विपुलतेतील सत्य आहे. हे असे सत्य आहे की, जे श्रीअरविंदांनी या पृथ्वीवर उतरविले आहे.

'सावित्री' ज्याचे प्रतिनिधित्व करते ते रहस्य आणि श्रीअरविंदांनी आपल्यासमोर जो भविष्यवेधी संदेश प्रकट केला आहे, तो संदेश शोधण्याचा व्यक्तीने प्रयत्न केला पाहिजे. हे कार्य तुम्हाला नेमून देण्यात आले आहे, ते अवघड जरूर आहे पण परिश्रम करण्यायोग्य आहे.

- श्रीमाताजी (Sweet Mother by Mona Sarkar)

**

# सावित्री महाकाव्याचा सारांश

(पुढील लिखाणामध्ये जेथे 'सावित्री' महाकाव्यामधील मूळ पंक्तींचा अनुवाद दिला आहे तेथे तो *तिरक्या (Italics)* अक्षरांमध्ये दिला आहे, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.)

## उषेचे प्रतीक

पृथ्वीतलावर उच्च चेतना जागृत होईल अशी सावित्रीला आशा होती. पृथ्वीवरील अंधकारमय, धूसर जीवनरूपी वस्त्रांचा स्वीकार केलेल्या सावित्रीने, आपले दैवी रूप आपल्या अत्यंत जीवलग असणाऱ्या प्रियजनांपासूनही झाकून ठेवलेले होते. ज्या अग्निदिव्याला तिला सामोरे जावे लागणार आहे त्या नियोजित क्षणाची ती वाट पाहत होती. त्या क्षणासाठी ती स्वतःची तयारी करत होती.

*तिच्या जिवाच्या या अगतिक क्षणीसुद्धा, म्हणजे मृत्यू आणि भीतीशी तिचा जो भीषण सामना होणार होता, त्या क्षणीसुद्धा तिच्या ओठांमधून एकही हुंदका बाहेर पडला नाही किंवा तिने कोणाकडे मदतीसाठी याचनाही केली नाही. तिने तिच्या वेदनेचे रहस्य कोणापाशीही उघड केले नाही. तिची चर्या शांतस्थिर होती आणि तिने धैर्यपूर्वक मौन राखले होते. तिचे केवळ बाह्य अस्तित्व दुःखभोग सहन करत होते, धडपडत होते.*

*तिचे मानवत्वसुद्धा अर्ध-दिव्य होते. तिच्या जीवनाने स्वतःमध्ये जणू विश्वाचा भार पेललेला होता. मनुष्यमात्राच्या साऱ्या भीषण समस्या ती जगत होती. ती काळाचे शिस्तबद्ध मार्गक्रमण सजगपणे पाहत होती. हिरवट हास्य करणाऱ्या या भयानक जगाकडे ती त्रयस्थपणे पाहत होती. ती जिवजातांचा अज्ञानी आक्रोश ऐकत होती.*

*क्षुद्र-सामान्य आवाजांच्या गलक्यामध्ये आणि न बदलणाऱ्या दृश्यामध्ये उभा राहून, तिचा आत्मा काळ आणि दैवाशी दोन हात करण्यास सिद्ध झाला होता. स्वतःमध्येच अचल राहून, तिने आपली सर्व शक्ती एकवटली होती.*

हाच तो दिवस होता, जेव्हा सत्यवान मृत्युमुखी पडणे भागच होते.

*

## भीषण घटना

जीवनांतील समस्या सर्वात भीषण रूप घेऊन आज तिच्यासमोर उभी ठाकली होती. पण सावित्री ही कोणी सामान्य स्त्री नव्हती. सामान्य माणसाप्रमाणे परिस्थितीला शरण जाऊन, आपल्या नशिबी आलेला भोग मुकाट्याने स्वीकारणे तिला मान्य नव्हते. शरीर धारण केल्यामुळे चेतनेवर येणाऱ्या अज्ञानाच्या मर्यादा आणि गूढतेची बंधने तिला मान्य नव्हती. आत्तापर्यंत चालत आलेली रीत तिला बदलायची होती; तिला अंधारावर प्रकाशाने विजय मिळवायचा होता. जीवनाने आणि प्रेमाने मृत्युवर मिळविलेला विजय तिला पृथ्वीवर आणायचा होता. त्यासाठी तिने आपल्या अंतरंगातील सर्व शक्तींना साद घातली आणि घनघोर लढाईसाठी ती सिद्ध झाली.

*

## राजाचा योग : आत्म्याच्या मुक्तीचा योग

सावित्रीचे पिता अश्वपती हे कोणी सामान्य नव्हते. ते एक अधिकारी योगपुरूष होते. उत्क्रांत पावणाऱ्या निसर्गशक्तीला आणि तिच्या गतीला ते अगतिकपणे शरण गेलेले नव्हते. साऱ्या विश्वाला स्वतःमध्ये धारण करण्याइतकी स्वतःची चेतना त्यांनी विशाल केली होती. धडपडणाऱ्या मानवी वंशाला परमेश्वर-सन्मुख करून, प्रगतिपथावर नेण्यासाठी त्यांचा जन्म होता. अतिचेतनेमध्ये असलेली विश्वाची मुळे त्यांच्यासमोर उघड झाली होती. ज्या बीजामधून या विश्वाची निर्मिती झाली होती तो दिव्य संकल्प त्यांना ज्ञात झाला होता. त्यांना फक्त सर्जक प्रकाश, शक्ती आणि आनंदाचाच अनुभव आला होता असे नव्हे तर, मागे खेचणाऱ्या अचेतनाचा, अंधकाराचा आणि जडतेचा अनुभवही त्यांना आला होता. स्वतःमधील या सर्व घटकांना हाती धरून, त्यांनी शाश्वत चैतन्यामध्ये एक अविचल अवस्था प्राप्त करून घेतली होती. त्यांनी भौतिक विश्व आणि त्यापलीकडे असणारे दिव्यत्व यांच्यामध्ये एक प्रकारचा सेतू निर्माण केला होता. या प्रवासादरम्यान अश्वपतींना ही जाणीव झाली होती की, *'तो' आपल्या अंधकारमय घटकांमध्ये आपल्या*

*नकळत प्रवेश करतो. आणि त्या अंधकाराचा बुरखा घेऊन, तो त्याचे कार्य करतो. तो सूक्ष्म आणि सर्वज्ञ असा पाहुणा आणि मार्गदर्शक असतो. त्या घटकांना गरज जाणवेपर्यंत आणि त्यांच्यामध्येसुद्धा परिवर्तनाची इच्छा उदयाला येईपर्यंत तो कार्य करत राहतो. येथील सर्वांनी उच्चतर धर्माचा कायदा पाळायला शिकले पाहिजे. आपल्या शरीरातील पेशींनी अमर्त्यत्वाची ज्वाला हाती धरली पाहिजे.*

*

**गुह्य ज्ञान**

अश्वपती आपल्या योगसाधनेच्या माध्यमातून अस्तित्वाच्या उच्च पातळ्यांवर पोहोचले तेव्हा, अनेक उच्चतर शिखरे त्यांच्या दृष्टिपथांत आली. प्रकृतीच्या अज्ञानाच्या मायापटलाच्या मागे उभा राहून, विशाल आत्मा आपल्या स्थिर स्थानावरून जीवन निरखीत असतो आणि तेथेच जीवनाच्या अस्तित्वाच्या कोड्याची गुरूकिल्ली असते, हेही अश्वपतींच्या लक्षात आले. त्यांच्या हेसुद्धा लक्षात आले की,

*'आपला पार्थिव खुजेपणा म्हणजे आपले सकलरूप नव्हे, तेथे भव्यतेला आणि असीमतेला वाव आहे. ज्या महानतेच्या अंशभागांमध्ये आपण जगत असतो, त्या अस्तित्वाची अमेय उंची, रुंदी आपली आहे. अनिर्वचनीय गूढतेशी समधर्मी असणारी सृष्टीची शिखरं ही स्वर्गाचे शेजारी आहेत. तिची विस्मृत व्यापकता अमर्त्य आहे. अप्रकट काळातील, गूढ शाश्वत हे आपल्या उच्चतम अस्तित्वांच्या शोधाच्या प्रतीक्षेत आहे. महाएकांत प्रहरांमध्ये, तेजसंपन्न, अगाध, परमानंदयुक्त अशा चंद्रज्योतीच्या महासागरामध्ये आणि चिदाकाशाच्या प्रगाढ शांतीमध्ये, निःशब्द शक्तीच्या सर्वदर्शी गरुड-शिखरांपर्यंत आपण जाऊन पोहोचू शकतो.'* हे त्याच्या लक्षात आले.

*

**राजाचा योग : आत्म्याच्या स्वातंत्र्याचा व महानतेचा योग**

अश्वपतींना गूढ ज्ञान झाल्यामुळे त्यांनी भौतिक प्रकृतीचे सारे बंध तोडले आणि आत्म्याच्या तेजस्वी प्रदेशात प्रवेश केला. गूढ विश्वांच्या उंबरठ्यावर

अश्वपतींना रक्षणकर्ती अशी एक शक्ती दिसली, तिच्या पाठीशी असलेले ईश्वरी अस्तित्वही त्यांना दिसले. आता त्यांना प्रकृती ही चेतनायुक्त शक्ती या स्वरूपात दिसली. अश्वपतींच्या प्रकाशित इच्छेला प्रकृतीच्या कार्याचे समग्र क्षेत्र दिसले. येथून अनंताचा, शाश्वताचा प्रांत सुरु होत होता. सृष्टीनिर्मितीचे रहस्य, उत्क्रांतीच्या आरोहण आणि अवरोहण करणाऱ्या अनेक श्रेणी त्यांच्या दृष्टिपथात आल्या.

*

## जगतांचा सोपानमार्ग

(अश्वपती आपल्या साधनेच्या साहाय्याने भूलोकाच्या वर असणाऱ्या ज्या ज्या प्रांतांमध्ये प्रवास करतात, त्या ऊर्ध्वस्थित असणाऱ्या जगतांची वर्णने या पर्वामध्ये आलेली आहेत.)

अश्वपतींना भौतिक जडाच्या पायावर बांधलेली व वरवर चढणारी प्रचंड स्तंभासारखी, एकावर एक रचलेल्या विश्वांची रचना दिसते. त्या रचनेचा ऊर्ध्वगामी प्रवास आत्म्याच्या अज्ञेय शिखराकडे चाललेला असतो. त्या पायऱ्यांवरून दिव्य शक्ती अवतरण करते व त्याच पायऱ्यांवरून आत्मा वर चढतो. ही शिडी चेतनारूपाने प्रत्येक व्यक्तीच्या अस्तित्वात पुनर्निर्मित होते. अज्ञानाच्या सर्वांत खालच्या पायरीपासून ते चेतनेच्या सर्वोच्च पायरीपर्यंत ती शिडी जोडलेली असते व त्यामुळेच मानवाचा या टोकापासून त्या टोकापर्यंत प्रवास शक्य होतो. चेतनेच्या या सर्व श्रेणी आणि त्यावर अवलंबून असलेली सर्व विश्वं ही पृथ्वीच्या उत्क्रांतीमय वाटचालीमधील मुख्य घटक असतात. पृथ्वीच्या मनात आतून एक ऊर्मी उसळते, तिला अंतरंगातूनच मार्गदर्शन मिळते आणि ती ऊर्ध्व दिशेने खेचली जाते. आपल्या अंतरंगामध्ये वास्तव्य करून असलेल्या द्रष्ट्या पुरुषाला ही सारी योजना ज्ञात असून त्याने प्रेरित केल्यामुळे आणि एक प्रकारे पृथ्वीची अभीप्साच अश्वपतींच्या रूपाने अभिव्यक्त होत असल्यामुळे, अश्वपती आता त्या जगत्-सोपानमार्गाची एकेक पायरी चढून वर जायला सुरूवात करतात.

*

## सूक्ष्म भौतिकाचे राज्य

भौतिक विश्वाच्या सीमा ओलांडून गेल्यावर अश्वपतींचा सूक्ष्म भौतिकाच्या आनंदमय अद्भुत विश्वामध्ये प्रवेश होतो. येथे जो आराखडा तयार होतो त्यानुसार पृथ्वीवर सर्व घटना घडत असतात. जडभौतिक विश्वाभोवती असणारे हे सूक्ष्म भौतिकाचे विश्व एखाद्या संरक्षक कवचाचे काम करते. या भौतिक विश्वामधून निघून गेल्यानंतर आत्म्याचा जो ऊर्ध्व दिशेने प्रवास सुरू होतो, त्या प्रवासामधील हे पहिले स्थानक असते.

*

## प्राणाचे वैभव आणि पतन

जीवनाच्या स्तरावर अश्वपतींना दोन प्रकार आढळून आले. वरच्या प्रदेशांत हास्य, आनंद, प्रज्ञा आणि स्वातंत्र्याचे साम्राज्य असते तर खालच्या प्रांतांमध्ये संघर्ष, कलह, भीती आणि दुःख यांचे शासन असते. अश्वपतींच्या नजरेला हे विश्व दिसले तेव्हा त्यांची अवस्था कशी झाली त्याचे वर्णन पुढे आले आहे.

*हे आनंदाचे विश्व त्याने पाहिले आणि त्या विश्वाची हाकही त्याला जाणवली; परंतु त्या विश्वाच्या आनंदामध्ये प्रविष्ट होण्याचा मार्ग काही त्याला सापडला नाही. त्या जागृत दरीवरून जाण्यासाठी तेथे कोणताही सेतू नव्हता. त्याच्या जिवाभोवती अजूनही काळोखी हवा घोंगावत होती. अस्वस्थ जीवनाच्या प्रतिमेशी तो अजूनही जखडून राहिलेला होता.*

प्राणशक्तीचा जडसृष्टीमध्ये प्रवेश होत असतानाच, अज्ञानाच्या काळ्या सावलीने आत्म्यावर आक्रमण केले आणि त्यामुळे जीवनाच्या गतिमानतेला खीळ बसली. जीवनाच्या नैसर्गिक सौंदर्यामध्ये व आनंदामध्ये क्षय आणि विकृती निर्माण झाली. जीवनाचे परिवर्तन कालांतराने होणाऱ्या मृत्युमध्ये झाले. प्रकृतीचा हा सारा खेळ पाहात-पाहात अश्वपती पुढे चालले होते.

*

## लघुप्राणाची राज्ये

प्राणशक्तीच्या आगमनाने काय बदल झाला हे अश्वपतींनी पाहिले.

त्यांच्या लक्षात आले की, आता पृथ्वीच्या भुकेमध्ये प्राणाची भूक मिसळली गेली आहे; माणसाचा ताबा आता वासनांनी, आवेगांनी घेतला आहे; अन्यथा मनुष्यसुद्धा पशुपक्ष्यांप्रमाणेच समाधानी राहू शकला असता. मात्र तो असमाधानी असल्यामुळेच धडपड करतो, प्रगतीसाठी प्रयत्नशील राहतो.

अश्वपतींना जडाच्या प्रांतामध्ये जीवनाचा, प्राणशक्तीचा उदय झाल्यानंतर, हळूहळू किडे, मग छोटेमोठे प्राणी, जनावरं, सस्तन प्राणी, मनुष्य प्राणी यांचा उदय झाला आहे हे दिसून आले. मनुष्याच्या रूपाने प्रकृतीने आत्मभान असणाऱ्या एका जीवाचा उदय घडविलेला होता. संवेदनाप्रधान मानसिकता असलेल्या मनुष्याच्या उदयानंतर, प्राणशक्तीच्या पुढच्या टप्प्यावर अश्वपती आता येऊन पोहोचले होते. मनाच्या स्तराच्या दबावामुळे ज्याला 'मन' म्हटले जाते त्याची घडण होत होती. विचारांच्या प्रकाशामध्ये कृती घडू लागल्या होत्या. मर्यादित बुद्धीचा येथे उदय झालेला अश्वपतींना दिसून आला.

*

## लघु प्राणांच्या देवता

अश्वपती वेगवेगळ्या जगतांमधून प्रवास करत होते. तिथे त्यांना खुज्या जीवनाचे साम्राज्यही दृष्टीस पडले. तिथे त्यांना सत्याची चाड न बाळगणाऱ्या व सतत अस्वस्थ हालचाल करणाऱ्या, खुज्या जिवांचा एक समुदाय दिसला. त्यामध्ये त्यांना अर्ध पशु व अर्ध दैवी शक्तीच्या योनीमधील यक्ष, किन्नर, पऱ्या, ठेंगू, भूते, पिशाच्च दिसू लागली. मायेच्या पटलामागे दडून सूचना देणे, संकटात लोटणे, गैरकृत्य करण्यास प्रवृत्त करणे, काम बिघडविणे, विष पेरणे आणि मजा बघत बसणे हेच त्यांचे उद्योग असतात. जेथे संकुचितपणा, गोंधळ आणि अज्ञान असेल तेथे हे क्षुद्र जीव त्यांचा प्रभाव पाडतात. माणसाला ते भलत्या मार्गाला नेतात.

*

## श्रेष्ठतर प्राणाची साम्राज्यं

खालच्या पातळीच्या जीवनातील अनागोंदी जगापासून निसटून

अश्वपतींनी आता महान जीवनाच्या प्रदेशांत प्रवेश केला होता. हा प्रदेश पृथ्वीवर खूप परिणाम घडवून आणणारा असतो. पृथ्वीवरील जीवनात उच्च पातळीवरच्या हालचालींची प्रेरणा येथून मिळते. सर्वोच्च परमात्म्यापासून अवतरण होताना जो परमानंद हरवलेला असतो तो हरप्रयत्नांनी पुन्हा मिळविण्याचा प्रयत्न मानवी जीवन करते. अश्वपती उच्च जीवनाचा मागोवा घेतात. मानवाला आशा असते की,

*एके दिवशी शाश्वत द्वारांमागील रहस्यं सोडून, तो (परमात्मा) पृथ्वीवर आणि जीवनामध्ये अवतरित होईल. जे जग त्याच्या मदतीची याचना करत आहे, त्या जगामध्ये तो अवतरित होईल. आत्म्याला मुक्त करणारे सत्य, आणि जिवाला नवदृष्टी प्रदान करणाऱ्या अनुभवाचा आनंद तो सोबत घेऊन येईल. कोणीतरी जणू प्रेमाने हातच दिला आहे, असे वाटावे असे सामर्थ्य तो घेऊन येईल.*

*

## रात्रीमध्ये प्रवेश

शांत मनाने व अलिप्त हृदयाने अश्वपतींनी जगाच्या अपयशाचे कारण शोधण्याचे ठरविले. ते अशा एका प्रदेशात पोहोचले की, जेथे सर्व गोष्टी म्हणजे एक मोठी फसवणूक असते. कारस्थाने आणि विश्वासघात हा तेथे नियमच असतो. तेथे स्वार्थ पराकोटीला पोहोचलेला असतो. प्रत्येकजण दुसऱ्याशी लढत असतो. जर कोणी उच्च पातळीवर जाऊन स्वतःचा उद्धार करू पाहत असेल तर त्याच्यावर सर्वजण तुटून पडतात व त्याला खाली खेचतात.

सत्याला तिथे हद्दपार करण्यात आलेले असते. तिथे सत्याची असत्य म्हणून टवाळी होते आणि असत्याला सत्य म्हणून सिंहासनावर बसविले जाते. येथे स्वर्गाचा रस्ता नरकाकडे घेऊन जात असतो. आसुरी शक्ती प्रकाशाचा वेश पांघरून त्याच्या आड स्वतःला लपवू पाहतात. अश्वपती या धोक्याच्या वाटेवरून, मुखाने ईश्वराचा नामजप करत सावधपणे पुढे जातात. काही वेळाने ते शांत, स्थिर होतात. आत्म्याची दृष्टी परतते. त्यांच्यातील दिव्य अंश जागा होतो आणि ते धोक्याला शांतपणे सामोरे जातात.

*

## असत्याचे जग, पापाची जननी आणि अंधाराचे पुत्र

विराटाला नाकारणारे एक अज्ञान जन्माला आले आणि त्यातून मृत्यू, वेदना आणि असत्य जन्माला आले आणि निर्मितीच्या मूळ योजनेची मोडतोड करून सर्व वातावरण विषारी केले गेले. सत्याचा प्रकाश मागे पडला आणि विरोधी शक्ती शाश्वत मातेचे स्थान बळकावून बसली. ही विरोधी शक्ती मानवी आकांक्षेला मागे ढकलते. मानवाची प्रगतीची इच्छा मारून टाकून, मानवाला कायम पशुपातळीवर ठेवण्याचा प्रयत्न करते. विरोधी शक्ती मानवाचे जीवन नासविते. त्याच्या मनाला चुकीची वाट दाखविते. श्रद्धा नाहीशी करण्यासाठी संशय पेरते आणि ईश्वराला जवळजवळ हद्दपारच करते. दिव्य मूलतत्त्वाच्या हकालपट्टीमुळे मानवाचा हा असा आंतरिक मृत्यू ओढवतो. अश्वपती या साऱ्याच्या निर्मितीच्या मुळाशी जाऊन पोहोचले आणि तिथे त्यांना परिवर्तनाची गुरूकिल्ली सापडली.

*

## प्राणिक देवतांचे नंदनवदन

अश्वपतींच्या भोवती आता एक तेजोवलय दिसू लागले होते. दुःख वा भीतीपासून मुक्त आणि विशाल असा एक आनंद तेथे असतो. प्राणिक देवदेवतांच्या या चमचमत्या उद्यानामध्ये सुसंवाद, सौंदर्य आणि परिपूर्णता हाच नियम असतो. येथे शांती, प्रेम आणि शक्ती त्यांच्या चरमसीमेपर्यंत पोहोचलेले असतात. येथे स्वर्ग आणि नरक यांतील दरी एक प्रकारे नाहीशी झालेली असते. येथे पृथ्वीचा जणू पुनर्जन्म झालेला असतो, ती जणू स्वर्गाची सोबती झालेली असते. अश्वपती आता जणू देवदेवतांच्या श्रेणीमध्ये जाऊन पोहोचले होते. दिव्य सौख्याचा त्यांच्यावर वर्षाव होतो. शरीराची कोणतीही हानी न होता, त्यांचे शरीर हा परमानंद अनुभवू शकले होते.

*

## लहान मनाची साम्राज्यं आणि देवता

प्राणिक नंदनवनाच्या वरती मनाचा स्थिर, शांत असा प्रांत असतो. आता अश्वपती ज्ञान आणि अज्ञान यांच्या सीमारेषेवरील या प्रांतापर्यंत येऊन

पोहोचलेले असतात. त्यांना या प्रांताच्या सर्वात तळाशी बाह्यवर्ती मन, भौतिक मन दिसते. जडभौतिक मनाच्या वर बुद्धीचा प्रांत असतो. अज्ञानाला आंतरिक ज्ञानाबाबत जागृत करणे हे मनाचे पहिले कार्य असते.

शारीर-मन, प्राणिक-मन आणि तार्किक-मन हे मनाचे तीन स्तर असतात. जागृत झालेल्या तर्कबुद्धीला ही जाणीव असते की वस्तुमात्रांच्या पाठीमागे एक महत्तर वास्तव आहे, तिला याचीही जाणीव असते की तिचे ज्ञान हे अर्धेमुर्धे ज्ञान आहे.

मनांच्या या तीन स्तरांच्या वरती मनाच्या आणखी दोन शक्ती असतात. जीवन-विचार ह्या मनाच्या तीन लघुशक्तींनी उभारलेल्या भिंती पाडून टाकतो. आणि खटाटोप करणाऱ्या मनाच्या नेहमीच्या आवाक्याबाहेर जाऊन त्या पलीकडच्या विशाल व उच्च प्रदेशांकडे आरोहण करतो. शुद्ध विचारी मन आपल्या विश्वातीत प्रकाशित अवस्थेमध्ये वैश्विक क्रियांचे अवलोकन करते.

*

## श्रेष्ठतर मनाची साम्राज्यं आणि देवता

मानवी मनाच्या मर्यादांच्या अतीत असणाऱ्या एका विशाल विश्वातीत 'विचारा'च्या प्रांतामध्ये अश्वपती प्रवेश करतात. 'शाश्वत आत्म्या'च्या 'दृष्टी'शी मेळ राखणारा असा हा उच्चतर विचार असतो. या शिखरांवर आदर्श मनाचे वैभव पाहायला मिळते.

हे आदर्श मनच, पृथ्वीवरील महान आशांचे, आंदोलनांचे उगमस्थान, प्रेरणास्थान असते. ते मनुष्य आणि ईश्वर यांच्यामधील दुवा असते. मनुष्याची प्रगती आणि पूर्णत्वावरील श्रद्धेचा उगम येथे असतो. मानवाचा आत्मा या तेजोमय स्तरांपर्यंत आरोहण करू शकतो. अश्वपतींनी या क्षेत्रामध्ये प्रवेश केला आणि विचारांची विशुद्ध जगते त्यांनी पाहिली. विचारांच्या तिहेरी प्रांतामधून त्यांचे हे आरोहण चालू होते.

*

## ध्येयाचा स्वर्ग

जागृत झालेल्या विचाराला अज्ञाताची शिखरं खुणावत राहतात.

चमकदार शिडीच्या एका टोकाला अश्वपतींना आदर्श मनाचे स्वर्ग दिसले. त्यांना शिडीच्या एका बाजूला कधीही मृत न पावणाऱ्या आनंदाची जगते दिसली. तर शिडीच्या दुसऱ्या बाजूला तेजोमय ज्ञानाचे महान प्रांत आणि मृत्युविरहित ज्योतीची साम्राज्ये दिसली. अश्वपती आदर्शाच्या या राज्यांमधून मार्गक्रमण करत राहतात. त्यांच्या लक्षात येते की कोणतीही संकल्पना कितीही महान, कितीही तेजोमय असली तरी ती आंशिक सत्य आहे आणि तरीसुद्धा प्रत्येक संकल्पना आपण स्वतःच एकमेव सत्य आहोत असे म्हणून वर्चस्व गाजवू पाहत आहे.

*

## मनाचे स्वरूप

जेथे आरोहण करणाऱ्या जगतांची शिडी काहीशी विराम पावलेली दिसत होती, अशा एका अचानक आलेल्या शांततेपाशी अश्वपती येऊन पोहोचले. ते आपल्या सर्व-शक्तिशाली मनाबरोबर, पण जगापासून दूर उभे राहतात. अचानकपणे एक प्रकाशकिरण येतो आणि 'अजून काहीही ज्ञात झालेले नाही', हे तो दाखवून देतो. जे जाणल्याने सर्वकाही जाणले जाते त्या सत्यापर्यंत आपण अजून आलेलो नाही, हे त्यांना उमगते. मनाने उभारलेले ज्ञानाचे मनोरे हे येथे अयोग्य, मिथ्या, मृत वाटू लागतात. संपूर्ण मानसिक इमारत कोसळून पडते. अश्वपतींच्या धडपडणाऱ्या आत्म्याचे जर समाधान व्हायचे असेल तर मनापेक्षा अधिक महत्तर आत्म्याचा शोध लागायलाच हवा.

*

## विश्वात्मा

अश्वपतींनी आता एका भुयारासारख्या असलेल्या मार्गामध्ये प्रवेश केला होता. त्यांनी आता स्थळ-काळाच्या गाभ्यामध्ये प्रवेश केला होता.

हे जगाच्या आत्म्याचे निजधाम असते. सर्व सांत (finite) जीवनाचा येथे उगम होतो. येथे ज्ञान हे विचारातून उगम पावत नाही तर ते एकात्मतेतून, अनुभूतीतून निर्माण होते. येथे विलगीकरण करणारा प्राण नसतो किंवा देहाचा सघन आकारही नसतो. तर येथे आत्मा त्याच्या स्व-रूपामध्ये असतो

आणि तो इतर आत्म्यांना थेटपणे भेटतो. अश्वपतींना आता येथे वस्तू त्यांच्या रूपाने नव्हे तर त्यांच्या आत्म्यातून जाणता येतात, त्यांच्याशी ते शब्दांविना संवाद साधू शकतात.

याच्या पलीकडे आनंद आणि शांतीचे प्रांत सुरू होतात. अश्वपतींना आता चिरंतनतेची जाणीव होते. आता ते वस्तुमात्रांच्या उगमापाशी ते येऊन पोहोचलेले असतात आणि तिथे त्यांना अर्धनारीनटेश्वरासमान द्वैतातील अद्वैताची एक अमर्त्य आकृती दिसते.

त्या दुहेरी अस्तित्वाच्या पाठीमागे त्यांना पडद्याआड असणाऱ्या दिव्य मातेचे दर्शन घडले. ती सर्वांची शासनकर्ती असते. अश्वपती तिच्या शक्तीने भारावून जातात. अश्वपती तिच्यासमोर प्रार्थना करण्यासाठी नतमस्तक होतात. तिच्या प्रकाशाने आणि आनंदाने ते भारावून जातात, तिचे स्तुतीगान करत असतानाच त्यांचे भान हारपते आणि ते तिच्या चरणांवर कोसळतात.

*

## श्रेष्ठतर ज्ञानाची साम्राज्यं

निद्रा आणि मृत्यू यांच्या पकडीतून मुक्त झालेले अश्वपती आता विश्व-मनाचे समुद्र ओलांडून जातात आणि शाश्वताच्या परिघापर्यंत येऊन पोहोचतात. अश्वपती आता जे जे ज्ञात होऊ शकते त्याच्या शिखरापर्यंत येऊन पोहोचलेले असतात, आता अखेरचे एकच रहस्य उलगडायचे शिल्लक असते. सर्व विविधता येथे 'एका' मधून प्रवाहित होत असते आणि अश्वपती त्या ऐश्वर्याचा एक भाग बनतात. अश्वपती 'अधिमानस' (Overmind) प्रांताच्या रहस्यांचा अभ्यास करतात. दिव्य संगीताशी त्यांचे सूर जुळतात. वैश्विक शक्ती ते स्वतःमध्ये रूजवितात.

*

## अज्ञेयाचा शोध

शोधाच्या अखेरीस अश्वपतींना असे उमगते की, त्यांचे सारे ज्ञान हे अज्ञातामध्ये समाप्त होते. त्यांच्या धडपडणाऱ्या हृदयावर एक शांतता स्थिरावते. जगाच्या इच्छांच्या ओढीपासून मुक्त झालेले अश्वपती

‘अनिर्वचनीया’ ची हाक ऐकून तिकडे वळतात.

*

## दिव्य मातेची प्रार्थना

अश्वपती जिथे जाऊन पोहोचले होते तो काही शेवट नव्हता. ही सुटका हा काही जिवाच्या परिश्रमांचा कळसाध्याय असू शकत नाही, आत्म्याला काही एक प्रयोजन असते, एक रहस्य सोडवायचे असते. ही शांतता आणि सुटका हे या प्रवासाचे केवळ एक द्वार असते. शून्याच्या पलीकडे अमर्त्याचा चेहरा असतो, तो चेहरा या जडभौतिक जगाच्या आकारामध्ये प्रकट करायचा असतो. अश्वपतींना विलोपनाचा (extinction) अनुभव आलेला असल्याने, त्यांना ज्याची आस होती ती ईश्वरी उपस्थिती आता जवळ आली होती.

*ईश्वराच्याही मागे ‘अव्यक्त परात्पर’ होते. ‘महन्माता’ विश्वावर पाखर घालून होती. कोणाचीही उपेक्षा न करता, जे जे काही आहे त्याचे उन्नयन करत, दिव्य चेतनेने आपले अद्भुत अस्तित्व प्रकट केले होते.*

ती सर्वांची माता होती, ती पृथ्वी आणि परमेश्वर यांच्यामधील मध्यस्थ होती. ती अज्ञाताचे तेजोमय हृदय होती. सारी प्रकृती तिलाच हाक देत असते. दिव्य- माता हीच मार्ग असते आणि तीच गंतव्य असते. अश्वपतींच्या साऱ्या शोधाची परिपूर्ती दिव्य-मातेपाशी होते.

तथापि अश्वपतींना हे जाणवले की, त्यांच्या एकट्याच्या मुक्तीने त्यांचे समाधान होणार नाही. ते दिव्य-मातेच्या प्रकाशाची आणि आनंदाची याचना यच्चयावत सर्व माणसांसाठी आणि पृथ्वीसाठी करतात. त्यांना याची जाणीव होती की, या उच्चतर हेतुसाठी त्यांचे स्वतःचे सामर्थ्य तोकडे आहे आणि म्हणून ते स्वतःमधील सारेकाही दिव्य-मातेला समर्पित करतात, जेणेकरून तिची विशाल शक्ती त्यांच्यामध्ये कार्यकारी व्हावी; अनंताने सांत व्यापून टाकावे, दिव्य-मातेच्या प्रेमाचा, सत्याचा आणि आनंदाचा स्पर्श या दुःखवेदना सहन करणाऱ्या जगाला व्हावा, यासाठी अश्वपती त्यांचा मुक्त आत्मा तिला समर्पित करतात.

*

## आत्म्याचे वसतिस्थान व नवनिर्मिती

अश्वपतींमध्ये आता एक अखेरचे महान रूपांतर घडून आले होते. या जगताला तारणाऱ्या उच्चतर अवतरणाची ते वाट पाहतात.

ते उच्चतर संकल्पशक्तीला समर्पित झाले होते. त्यांचे हृदय प्रज्वलित झाले होते; उंच उंच जाणाऱ्या अभीप्सेच्या या ज्वालेला आता कोणीच विझवू शकले नसते.

*

## दर्शन आणि वरदान

अश्वपती ज्या दिव्य-मातेची आराधना करत होते ती दिव्य-माता आता त्यांच्यासमोर प्रकट झाली होती. ती त्यांच्याशी बोलू लागली, "निर्मितीच्या शिखरांवर आरोहण करून आलेल्या हे सामर्थ्य-पुत्रा, अजूनही जे जग अचेतन आहे त्या जगामध्ये माझ्या अवतरणासाठी विनवणी करू नकोस. मनुष्य इतका दुर्बल आहे की तो अनंताचा भार पेलू शकणार नाही."

तेव्हा अश्वपती बोलू लागले, "मी जाणतो की, मनुष्य हा काही शिखरस्थानी नाही. एक अधिक महान असा मानव उदयाला यावा म्हणून आम्ही परिश्रम करत आहोत." अश्वपतींशी पुष्कळसे बोलणे झाल्यानंतर दिव्य मातेने प्रतिसाद दिला. ती म्हणाली,

*"एक जण असा अवतरेल की, जो हे पोलादी कायदे तोडून टाकेल आणि प्रकृतीचा झाकोळ आत्मशक्तीने परिवर्तित करेल. एका महाभयंकर मृत्यु-घटिकेमध्ये एक बीज पेरले जाईल, स्वर्गाची एक फांदी मानवी भूमीमध्ये रोवली जाईल आणि प्रकृती तिची मर्त्य पायरी ओलांडून पुढे झेपावेल."*

दिव्य मातेची ती आकृती हळूहळू अंतर्धान पावू लागली, तेव्हा एका नव्या विजिगीषू वृत्तीने (conquering spirit) अश्वपतींनी पुन्हा त्यांच्या परिश्रमांनाआरंभ केला.

*

## दिव्य ज्योतीचा जन्म आणि बालपण

पृथ्वीने आनंदासाठी केलेल्या प्रार्थनेला प्रतिसाद म्हणून, एक स्वर्गीय

चैतन्य या पृथ्वीवर अवतरले, 'सावित्री'चा जन्म झाला. पृथ्वीवरील आपले अपुरे राहिलेले कार्य करण्यासाठी आदिमाता परतली होती. सावित्रीचे बालपण अतिशय सुखासमाधानात चालले होते. ती आपल्या सभोवतीच्या सर्वांना आनंदाचे वितरण करत असे. ती उच्चतर प्रकृतीशी एकात्म पावलेली होती. तिचे जीवन म्हणजे आनंद, सौंदर्य, प्रेम आणि प्रकाश यांचा जणू झराच होता.

*

## दिव्य ज्योतीचा विकास

सर्वांना आपल्या कवेत घेऊन त्यांना ईश्वराकडे घेऊन जाण्याचा सावित्रीचा प्रयत्न असे. परंतु तिच्या हाकेला फारच थोडे जण प्रतिसाद देऊ शकत असत, अगदी मोजक्या लोकांनाच तिच्यातील दिव्यत्वाची जाण होती. परंतु वातावरणामध्ये एक प्रकारची वाढती अपेक्षा निर्माण होत गेली, आता तिची कीर्ती सर्वदूर पसरू लागली होती. सारे जण तिची स्तुती करत असत पण तिच्यासमान असे तिला कोणीच भेटत नव्हते.

*

## शोधाची हाक

एका सुखद सकाळी अश्वपतींच्या कानावर पुढील शब्द पडले.

*"अरे, आवेगाच्या गुलामा, दैवसंचालित भूलोकउत्पन्न वंशा, अनंत अशा विश्वातील क्षुद्र साहसवीरांनो आणि खुज्या मानवतेच्या बंदिवानांनो, तुमच्या मर्यादित छोट्या 'स्व'भोवती आणि क्षुद्र किरकोळ गोष्टींभोवती, मनाच्या गोलगोल फिरणाऱ्या त्याच त्या चाकोरीतून तुम्ही किती काळ फिरत राहणार? परिवर्तनहीन अशा क्षुद्रतेसाठी तुमचे अस्तित्व नाही, तुमचे अस्तित्व त्याच त्या निरर्थक, निरुपयोगी अशा पुनरावृत्तीसाठी घडविले गेलेले नाही."*

ती दिव्य वाणी थांबली आणि एक प्रकारे त्याला प्रत्युत्तर म्हणून अश्वपतींना समोरून सावित्री येताना दिसली. तिच्या भौतिक रूपाच्या पलीकडे जाऊन पाहताना अश्वपतींना तिचे महान आणि अज्ञात चैतन्यतत्त्व जाणवले. एका उंचीवरून त्यांनी तिला सांगितले, "शाश्वताचा प्रवासी

असणाऱ्या जिवा (हे सावित्री), तू येथे एक महान कार्य करण्यासाठी आली आहेस. परंतु तू येथे एकटी आलेली नाहीस, तुझ्या कार्याची आणि तुझ्या सामर्थ्याची जाण असणारा कोणी तुझी प्रतीक्षा करत आहे. जा आणि तुझ्या जीवन-साथीदाराचा शोध घे. त्याच्या सोबतीने प्रकृतीचे गुप्त वेश भेदून, तू दिव्यत्वाच्या उंचीवर पोहोचणार आहेस.” अश्वपतींचे हे शब्द जणू मंत्रवत होऊन, तिच्या अंतःकरणाला जाऊन भिडले. तिच्यामध्ये आता जणू एक निराळीच जागृती आली होती; अदृष्ट प्रांतांची रहस्यं तिच्या जवळ आली असल्याचे तिला जाणवले. सावित्री दुसऱ्या दिवशी पहाटेपूर्वीच शोधार्थ बाहेर पडली.

*

## वरसंशोधन

सावित्रीचा रथ वेगवेगळ्या प्रांतांमधून पुढे सरकत होता. परंतु तिचा शोध अजून पूर्ण झालेला नव्हता. ती ज्याच्या शोधात होती, तो नियत चेहरा अजून तिच्या दृष्टीस पडलेला नव्हता.

*

## नियोजित भेटीचे स्थळ

नियोजित भेटीचे स्थळ आणि क्षण आता जवळ आला होता. जिथे पृथ्वीचा स्वर्गाबरोबर जणू प्रणय चालू आहे, असे वाटावे अशा एका ठिकाणी सावित्री येऊन पोहोचली होती. तिथे सावित्रीला तिचे ‘प्रेम’ गवसले.

*

## सत्यवानाची भेट

एका विशाल अरण्यामध्ये एक पाऊलवाट गेलेली होती. सावित्री ज्याच्या शोधार्थनिघाली होती तो तिला प्रथम तिथे भेटला. त्याचे उमदे, शांत, सुंदर, आनंदी रूप तिच्या नजरेस पडले. त्याची आणि तिची नजरानजर झाली. सत्यवान आणि सावित्री दोघांनाही परस्परांची ओळख पटली. आता एका नवीन पर्वाची सुरुवात झाली होती.

*

## सत्यवान आणि सावित्री

सत्यवान आणि सावित्री दोघेही परस्परांना अंतरंगातून जाणतात. सत्यवान म्हणतो, “मर्त्य मानवांपेक्षा तू कोणी निराळीच दिसतेस. तुझे नाव काय? तुला या भूतलावर राहणे शक्य असेल तर तू इथे उतर आणि माझ्यासोबत चल. माझ्या वडिलांचा आश्रम इथे जवळच आहे.”

सावित्री उत्तर देते, “मी सावित्री, मद्र देशाची राजकन्या. पण तू कोण आहेस? आणि तू इथे कसा?”

सत्यवान म्हणतो, “द्युमत्सेन हे या सर्व प्रदेशाचे राजे होते. पण नियतीच्या आघाताने ते दृष्टीहीन झाले आणि इथे अज्ञातवासात आले आहेत. मी त्यांचा मुलगा, माझे नाव सत्यवान. मी येथेच निसर्गाच्या सान्निध्यात लहानाचा मोठा झालो आहे. जेव्हा मी या जगताकडे पाहत होतो तेव्हा मी मलाच हरवून बसलो आणि जेव्हा मला माझा आत्मा गवसला तेव्हा मी विश्व हरवून बसलो. या दोहोंमधील दुवा मला सापडलेला नाही. पण तुझ्या पावलांनी आता तो दुवा चालत आला आहे. तू माझ्या जीवनमंदिरात प्रवेश करत, अवतरण कर.”

सावित्री म्हणते, “मी तुझे बोलणे ऐकले आणि आता माझी खात्री पटली आहे की, मी ज्याच्या शोधात आहे तो तूच आहेस.” सत्यवान मग तिला त्यांच्या आश्रमामध्ये घेऊन जातो. सावित्रीला भरून येते आणि ती म्हणते, “आता मला माझ्या वडिलांकडे गेले पाहिजे. पण माझे मन येथेच राहील, पुन्हा कधीही विलग न होण्यासाठी मी आता लवकरच येथे परतून येईन.”

*

## दैवाचे भाकीत

अश्वपती सावित्रीच्या निवडीला संमती देतात. त्यावेळी दरबारात उपस्थित असलेले नारद सत्यवानाविषयी गौरवोद्गार काढतात, सत्यवानाची थोरवी कथन करतात, पण हेही सांगतात की, ‘सत्यवानाच्या हातात आता फक्त बारा महिनेच शिल्लक आहेत.’

परंतु सावित्री तिच्या निर्णयापासून मागे हटत नाही. दैवाच्या

कायद्यापेक्षा आपल्या आत्म्याची इच्छा बलवत्तर आहे, याची तिला खात्री असते. ''जीवनाच्या कठोर वास्तवाकडे दुर्लक्ष करू नकोस,'' असे तिची आई तिला समजावू पाहते. पण सावित्री हार मानत नाही.

*

## नियतीची रीत आणि दुःखाचे संकट

पुढे अश्वपती आणि नारद यांच्यामध्ये दैव, मनुष्याचे जीवन इत्यादी बाबतीत विस्तृत चर्चा होते. अंतिमतः नारद सांगतात की, ''सत्यवान मरणे भागच आहे, ते विधिलिखित आहे; त्याच्या मृत्युचा क्षण निर्धारित आहे. अन्य जे काही घडायचे आहे ते सावित्रीच्या आत्म्यामध्ये लिहिलेले आहे. अज्ञानामध्ये कार्यकारी असणारे सत्य म्हणजे दैव होय. ते स्वीकारायचे की नाकारायचे हे मनुष्य ठरवू शकतो. विरोधी शक्तींशी झुंज देत, ईश्वराप्रत केलेली वाटचाल ही मनुष्याची नियती असते. त्याने मार्गावर कितीही अडचणी आल्या, संकटे आली तरी अथकपणे प्रगत होत राहिले पाहिजे. सरतेशेवटी तो अज्ञानाच्या अंतिम सीमा ओलांडेल आणि ईश्वराच्या वैभवशाली शिखरांवर येऊन पोहोचेल.''

नारद सावित्रीच्या आईला समजावून सांगतात, ''सत्यवान मरणे भागच आहे, त्याच्या मृत्युबद्दल शोक करू नकोस. त्याच्या मृत्युमधूनच मानवासाठी एका महान जीवनाचा आरंभ व्हायचा आहे.''

*

## मीलनाचा आनंद, मृत्युच्या पूर्वज्ञानाचे अग्निदिव्य
## आणि
## हृदयाच्या दुःखवेदना

सावित्री आता सत्यवानाच्या सहवासात सुखाने नांदत होती. दिवसरात्र ते एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडाले होते. मात्र लवकरच तिला नारदांनी सत्यवानाच्या मृत्युच्या सांगितलेल्या भाकिताची आठवण होऊ लागली. प्रेमानंदामध्ये ती ते दुःख विसरण्याचा प्रयत्न करत होती. परंतु येणारा प्रत्येक दिवस तिला त्या संकटाच्या दिशेने अधिकाधिक जवळ घेऊन जात

होता आणि तिच्या दुःखात भर घालत होता. आता वर्ष सरत आले होते. आकाशामध्ये काळे ढग दाटून आले होते त्याप्रमाणे तिच्या हृदयातही दुःखाचे ढग दाटून आले होते.

*

## आत्मशोधाची बोधकथा

एका रात्री, येऊ घातलेल्या नियत क्षणाच्या काळजीमध्ये निमग्न होऊन बसलेली असताना, सावित्रीला तिच्या अस्तित्वातील अत्युच्च पातळीवरून येणारा एक आवाज ऐकू आला. तिचा त्याच्याशी संवाद सुरू झाला. मानववंशाचे ईश्वरामध्ये रूपांतर करण्याच्या विशाल आराखड्याच्या केंद्रस्थानी सावित्री होती.

एका नवीन जगताचा शोध लावण्यासाठी किंवा एक नूतन जगत निर्माण करण्यासाठी ती जन्माला आलेली होती. पृथ्वीने स्वतःचे रूपांतर करून घेतले पाहिजे, ती स्वर्गासमान झाली पाहिजे अथवा स्वर्गच पृथ्वीवर अवतरला पाहिजे. परंतु हे रूपांतर होण्यासाठी अंतरात्मा आपल्या गुप्त स्थानामधून बाहेर आला पाहिजे आणि मन, प्राण व शरीर यांच्यावर त्याने स्वतःची सत्ता प्रस्थापित केली पाहिजे. वरून आलेल्या आज्ञेनुसार सावित्री तशीच स्तब्ध बसून राहिली होती.

तिला आता तिच्या अंतरंगामध्ये स्वतःच्या आत्म्याचा शोध घ्यायचा होता.

*

## आंतरिक प्रांतांमध्ये प्रवेश

सावित्रीने आता सूक्ष्म जडभौतिक विश्वामध्ये प्रवेश केला होता. नंतर विचारी-मनाचा प्रांत सुरू होतो. "तू ज्या परिपूर्णतेच्या शोधात आहेस, ती परिपूर्णता तुला इथेच गवसेल, तेव्हा आता तू इथेच विश्रांती घे", असे तिला सुचविण्यात येते. परंतु ती तिच्या आत्मशोधाच्या दिशेनेच पुढे वाटचाल करत राहते. मार्गामध्ये तिला विविध देवदेवता आणि या जगताचे तारणहार असे जीव भेटतात. त्यांच्यापैकीच एक जण तिला गुप्त आत्म्याकडे घेऊन जाणारी

वाट दाखवितो आणि ती त्या रस्त्याने पुढे पुढे जाऊ लागते. आपला आत्मा जवळच आहे असे तिला जाणवू लागते.

*

## त्रिविध आत्मशक्ती

सावित्रीचे आरोहण सुरू होते. मार्गामध्ये तिला 'दुःखदेवता', कारुण्यमूर्ती भेटते.

तिच्या पाठोपाठच तिला एक दुःखस्वरूप मानव भेटतो. सावित्री या दोघांचेही सांत्वन करते आणि पुढे सरकते.

पुढे तिला काळोख्या शक्ती आणि मृत्यू यांच्यापासून प्रकाशाचे संरक्षण करणारी 'शक्ती-देवता' भेटते. ती ईश्वराच्या आगमनाची प्रतीक्षा करत असते.

तेवढ्यात अचानक तेथे इच्छामय जगताचा अहंकार पुढे येतो. सावित्री शक्ती-देवतेलाही दिलासा देते.

सावित्री आणखी वर आरोहण करते, तेव्हा तिला तेथे 'प्रकाशाची माता' भेटते. ती सांगते की, पृथ्वीवर प्रेमाचे आगमन व्हावे म्हणून ती पूर्वतयारी करत आहे.

तेवढ्यात एका भोगलोलुप माणसाचा आवाज तिच्या कानी पडतो. पण तो कबूल करतो की, त्याचा मार्ग आता खुंटला आहे.

सावित्री त्या प्रकाशमातेला आश्वासन देते की, "एक दिवस परमेश्वराच्या हातात हात गुंफून मी परत येईन तेव्हा तुला परमेश्वराचे दर्शन घडेल. तेव्हा एका दिव्य कुटुंबाचा जन्म होईल आणि सर्व जगतांमध्ये प्रकाश आणि शांती नांदेल."

*

## आत्म्याचा शोध

सावित्री स्वतःच्या अंतरंगामध्ये दालनांमागून दालने चालत गेली. आणि सर्वांत शेवटच्या दालनामध्ये तिला एका सुवर्णसिंहासनावर बसलेला परमात्मा दिसला. तो शब्दातीत होता पण तोच सर्वांचा उगम असतो.

सावित्रीचा आत्मा परमात्म्यामध्ये विलीन होतो.

पुन्हा एकदा सावित्री मानवी देहामध्ये स्वतःला पाहते. तिला असे आढळते की, तिच्या हृदयाची अर्ध-उन्मीलित कमल-कलिका आता विकसित झाली आहे आणि तिचा गुप्त आत्मा प्रकट झाला आहे.

तिचे अस्तित्व महन्मातेला आवाहन करते आणि एका क्षणात एक दिव्य चेहरा, एक आकार तिच्या हृदयात अवतरतो. सहस्रार चक्रामध्ये ती महन्माता आपल्या मूळ सामर्थ्यानिशी बसलेली असल्याचे तिला आढळते. सावित्रीमध्ये आता स्वर्गीय बदल घडून आला होता. तिच्या चेतनेची सर्व केंद्रे आता रूपांतरित झाली होती. या साऱ्या चक्रांच्या पाठीमागे तिचा अमर्त्य आत्मा उभा होता, त्याने अज्ञानाचे आवरण बाजूला सारले होते आणि त्याने आता स्वतःला विश्व-जननीच्या हाती समर्पित केले होते.

*

## निर्वाण आणि शून्याकार परमात्म्याचा शोध

आता शिशिर ऋतुला सुरूवात झाली होती. सावित्री आनंदी होती, तिला आता तिच्या अस्तित्वाचे ध्येय उमगले होते. परंतु पुन्हा एके दिवशी तिच्या नसांमधून एक भीती उदयास आली होती. ‘निशेचा आवाज’ तिच्याशी बोलू लागतो, तो तिच्या आत्म्याच्या सत्यतेविषयीच शंका उपस्थित करतो. परंतु या ‘निशेच्या आवाजा’ नंतर, एक ‘प्रकाशाचा आवाज’ खाली अवतरतो. तो म्हणतो, “ईश्वराच्या तिमिरामध्ये तू तेजोमय साम्राज्य शोधण्यासाठी आली आहेस. तुला जर दुःखभोगापासून या विश्वाला वाचवायचे असेल तर, तुला स्वतःला ते दुःखभोग सहन करावेच लागतील. तुझ्यामधून सर्व विचारांना हद्दपार कर आणि ईश्वरी शून्यावस्थेचा अनुभव घे म्हणजे तुला ईश्वराच्या गूढाचे रहस्य सापडेल.”

सावित्रीला आता एक निराकार मुक्ती गवसलेली असते. सावित्री अनंतामध्ये निघून जाते. ती म्हणजे अज्ञातामधील एक बिंदू झालेली असते. तिला ही अनंत शून्यावस्था अंतिम असल्यासारखी वाटत होती.

*

## विश्वात्म्याचा शोध आणि विश्वचेतना

सावित्री तिचे दैनंदिन जीवन नेहमीप्रमाणेच व्यतीत करत होती. तिच्यामध्ये अंतरंगातून आमूलाग्र बदल झाला होता. एके रात्री, ती निद्रिस्त सत्यवानाच्या शेजारी बसलेली असताना, तिच्या अंतःकरणातून एक आवाज तिच्याशी बोलू लागतो आणि सारे सचेत बनते; आणि त्या गोष्टी स्वतः अनंत असल्याचे व त्या शाश्वतापासून बनल्या असल्याचे सावित्रीसमोर प्रकट करतात. सावित्री आता स्थलकालातीत झाली होती. सारे विश्व म्हणजे सत्याचा देह आहे आणि ईश्वर हा त्या विश्वाचा आत्मा आहे, असा साक्षात्कार तिला होतो. ती आता प्रकृतीशी तदाकार होते आणि निसर्गातील सर्व हालचाली तिला स्वतःमध्ये जाणवू लागतात. ती आता अनंतामध्ये विस्तारते, साऱ्या विश्वाशी एकरूप होते. ती स्थलकालातीत होऊन, अतिचेतनेमध्ये (Superconscient) प्रवेश करते आणि अनंतामध्ये वावरू लागते, तिच्या माध्यमातून शाश्वतताच आता काळाकडे पाहू लागते.

*

## अरण्यामध्ये मृत्यू

सत्यवानाच्या मृत्युचा तो नियत दिवस आज उगवला होता आणि फक्त सावित्रीलाच त्याची जाणीव होती. सावित्री दुर्गामातेला वंदन करते, प्रार्थना करते. सावित्री आज प्रथमच सत्यवानाबरोबर अरण्यात आलेली असते. सत्यवान सरपणासाठी एक झाड तोडत असतो, मात्र थोड्या वेळाने त्याचे सर्वांग वेदनांनी भरून जाते. तो हातातील कुऱ्हाड दूर भिरकावून देतो आणि सावित्रीचा आधार घेऊ पाहतो. ती त्याला हृदयाशी कवळून घेते आणि त्याच्या वेदना हलक्या करण्याचा प्रयत्न करते, पण त्याच्या चेहऱ्यावरचा रंग आता उडालेला असतो.

तिला जाणीव होते की, ते दोघे आता या अरण्यात एकटेच नाहीत. एक गोठवणारी छाया तेथे दिसत होती. सर्वत्र भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. साक्षात मृत्युच तेथे उभा होता. सत्यवान मरण पावला होता.

*

## काळ्या शून्याकडे प्रयाण

त्या एवढ्या विशाल अरण्यामध्ये सावित्री आपल्या पतीच्या पार्थिवासमवेत एकाकीपणे बसली होती; मात्र ती शोक करत नव्हती. तिचा आत्मा वर वर जात, तिच्या अस्तित्वाच्या शिखरापर्यंत जाऊन पोहोचतो. तिच्या आत्म्यामध्ये एक नवीनच शक्ती अवतरीत होते आणि सावित्री पूर्णपणे बदलून जाते.

दुःख, शोक या साऱ्या गोष्टी आता मागे पडल्या होत्या. तिचे मन शांतस्थिर झाले होते. तिने आपल्या पतीचे पार्थिव शरीर जमिनीवर ठेवले आणि ती मृत्युदेवाला भेटण्यासाठी त्याच्याकडे वळली. सत्यवानावरून सावित्री आणि मृत्युदेवामध्ये संघर्ष होतो. आता सत्यवान पुढे, त्याच्या पाठीमागे मृत्युदेव आणि त्याच्या पाठोपाठ सावित्री असे जाऊ लागतात. ते आता एका सीमारेषेपाशी येऊन पोहोचतात. मृत्यू तिला सांगतो, "आतातरी परत जा. तू तिथे जिवंत राहू शकणार नाहीस. माणसं फक्त मानवी मर्यादांमध्येच सुरक्षितपणे जीवित राहू शकतात. तू अविचार करू नकोस, नाहीतर तुझा विनाश निश्चित आहे."

सावित्री त्याला उत्तर देत नाही. अग्नी आणि प्रकाशाची जणू लखलखती ज्वालाच असावी तशी ती उभी राहते.

*

## शाश्वत रात्रीतील प्रवास - अंधाराचा आवाज

सावित्री आणि मृत्युदेव यांच्यात संभाषण सुरू होते. मृत्यू म्हणतो, "या पोकळीमध्ये जीवनाला आणि प्रेमाला जागाच कोठे आहे ? तू या शून्यामध्येही टिकून राहिली आहेस, तू जिंकली आहेस, पण त्याचे प्रयोजन काय ? तुझ्या अद्वितीय सामर्थ्यासाठी तुला मी बक्षिस देऊ इच्छितो, तू मागशील ते मी तुला देईन."

सावित्री उत्तर देते : "हे मृत्युदेवा, मी तुझ्यासमोर झुकणार नाही. मला माझ्या शक्तीच्या अमर्त्यत्वाची जाणीव आहे. तुला जर मला काही द्यायचेच असेल तर, सत्यवानाला त्याच्या बालपणी जे जे हवे होते ते सारे त्याला दे."

मृत्युदेव तिला सत्यवानाच्या वडिलांचे साम्राज्य आणि त्याची दृष्टी परत करतो. आणि तिला पृथ्वीवर परतायला सांगतो. मृत्युदेव आणि सावित्री यांच्यामध्ये बरीच चर्चा होते. सावित्रीने आज्ञा केल्याप्रमाणे ते तिघेही त्या रात्री प्रवास करत राहतात.

*

## आदर्शाच्या संधिकालाचे स्वप्न

हळूहळू काळोख कमी होत जातो आणि धडपडणारी उषा क्षितिजावर दिसू लागते. सावित्री अशा एका नवीन आनंदी संधिप्रकाशमय जगतामध्ये येऊन पोहोचते की जेथे सारे धूसर असते. धूसर दृश्य, धूसर आत्मे, धूसर संगीत, अवर्णनीय असे आकार तेथे असतात. तेथे कोणतीच गोष्ट सुनिश्चित नसते, तेथे काहीही टिकाऊ नसते. आणि असे असूनही तेथे त्या आकारांमध्ये एक अनोखे सातत्य असते. तेथे एक माधुर्य असते आणि अ-पार्थिव असे आवाहन असते. ते मोहमयी आणि क्षणिक आनंदाचे जग असते. तिचा आत्मा या साऱ्याकडे वरून पाहत होता आणि त्याच्या उच्च कार्यासाठी, एखाद्या अढळ ताऱ्याप्रमाणे तो जीवन जगत होता.

*

## मृत्युचा संदेश आणि आदर्शाचा फोलपणा

आता मृत्युदेव सावित्रीशी बोलू लागतो, तिला प्रेमाची क्षणभंगुरता समजावू पाहतो. सावित्रीने सत्यवानाचा नाद सोडावा आणि पृथ्वीवर परतावे यासाठी तिला तो हरप्रकारे सांगू पाहतो. सावित्री मृत्युला सांगते, “तू म्हणतोस तसे माझे प्रेम केवळ शारीरिक नाही. ते ईश्वराकडून आलेले आहे. एक दिवस आम्ही महन्मातेच्या सन्मुख असू.”

सावित्री म्हणते,

*“एके दिवशी मला माझे महन्मधुर विश्व गवसलेले असेल. देवतांचे भयानक मुखवटे दूर सारून, भीतीचे बुरखे फाडून आणि पापावरील आवरण फेकून देत, शांत झालेलो आम्ही आमच्या दिव्य मातेच्या सन्मुख नेले जाऊ. आम्ही आमचे प्रांजल जीव तिच्या मांडीवर ठेवू. तेव्हा मग आम्ही ज्या*

*परमानंदाच्या शोधात होतो तो परमानंद आम्हाला गवसेल. दीर्घकाळ आम्ही ज्याचा शोध घेत होतो त्या देवतांसोबत आम्ही सद्गदित होऊ; तेव्हा आम्हाला अवचितपणे स्वर्गातील पावित्र्याचा लाभ होईल."*

मृत्युदेव तिला सांगू पाहतो की, "पृथ्वीवर स्वर्ग उभारण्याचा तुझा हा प्रयत्न व्यर्थ आहे. पृथ्वीवरील कायद्याचे पालन कर, माझी दीर्घ आणि शांत झोपेची रात्र जोवर तुझ्यावर अधिकार सांगत नाही तोपर्यंत पृथ्वीवर जाऊन जीवनाने देऊ केलेल्या आनंदाचा उपभोग घे आणि जे दुःख सहन करावेच लागणार आहे ते दुःख सहन कर."

*

## प्रेम आणि मृत्युचा वादविवाद

सावित्रीने येथे मृत्युला आजवर झालेली जीवनाची उत्क्रांती आणि त्यातील मानवाचे स्थान, मानवाची थोरवी कथन केली. सर्व वस्तुमात्रांच्या मुळाशी एक दिव्य आनंद लपलेला आहे हेही तिने त्याला सांगितले.

ती मृत्युला सांगते की, "मी माझ्या अंतरंगामध्ये तुझ्यावर विजय मिळविलेला आहे. मी तुझ्याकडे सत्यवानाची मागणी करत आहे ती, माझ्यासाठी नाही; तर आम्हाला या पृथ्वीवर ईश्वराचे जे कार्य करायचे आहे त्यासाठी करत आहे आणि आम्ही त्यासाठीच येथे आलो आहोत. जगातील दुःखावर आनंदाच्या साहाय्याने उपचार करण्यासाठी, मानवाच्या रित्या हृदयामध्ये प्रेम भरण्यासाठी आम्ही येथे आलो आहोत. हे मृत्यो, माझा संकल्प हा तुझ्या कायद्यापेक्षा महान आहे, आणि माझे प्रेम हे नियतीपेक्षा बलवत्तर आहे. परमेश्वराने मला प्रेमाचे वरदान दिले आहे आणि प्रेम हीच माझी ताकद आहे. "

येथे मृत्युदेव आणि सावित्री यांच्यामध्ये पुष्कळच वाद-संवाद होतो. तो मुळातूनच समजावून घेण्यासारखा आहे. मृत्युदेव सावित्रीला तिच्या धडपडीचा फोलपणा आणि त्याची अशक्यता पटवून देऊ पाहतो आणि सावित्री त्या धडपडीचे महत्त्व मृत्युला पटवून देऊ पाहते. तिला जे साध्य करायचे आहे त्यासाठी तिला सत्यवानाची आवश्यकता आहे. मृत्यू तिला

प्रलोभने देऊन सत्यवानाच्या मागणीपासून विचलित करू पाहतो, पण ती कोणत्याच प्रलोभनांना बळी पडत नाही.

सावित्री म्हणते, “तू आमची चेष्टा करत आहेस, पण मला निश्चित माहीत आहे की, सत्यवान आणि मी चिरकालीन वर आणि वधू आहोत. अमर अग्नीच्या साक्षीने पृथ्वीवर स्वर्गाचा विजय व्हावा म्हणून आमचा विवाह झालेला आहे. हे मृत्यो, तू माझ्याशी व्यर्थ वाद का घालत आहेस?”

जगाच्या नियमांत उलथापालथ घडवून आणणारी त्यांची यात्रा पुढे चालू राहते.

*

## पार्थिव वास्तवतेचा स्वप्निल संधिप्रकाश

मृत्युदेव पुन्हा एकदा सावित्रीला सांगू पाहतो की, “प्रकृतीच्या नियमांच्या पलीकडे जाण्याचा प्रयत्न मानवाने करता कामा नये. मी मृत्यू, हेच अमरतेचे द्वार आहे. तेव्हा तू व्यर्थ प्रयत्न करू नकोस.”

सावित्री त्याला म्हणते, “तुझी वरदाने भित्र्या लोकांना दे, मला ती नको आहेत. मी अनंत शांतीमध्ये विश्रांती घेऊ इच्छित नाही. आता माझ्या एकटीच्या मुक्तीने माझे समाधान होणार नाही. मी सर्वांच्या आत्म्याच्या मुक्तीची मागणी करत आहे.”

सावित्रीच्या निश्चयाने मृत्युचा स्वरदेखील पालटतो. तो तिला म्हणतो, “तुझ्यामध्ये जर जिवंत सत्य असेल तर ते मला दाखव, म्हणजे मी देखील त्या सत्य-देवतेची पूजा करू शकेन. मृत झालेल्यामध्ये पुन्हा जीवन निर्माण करता येत नाही, एवढे एकच सत्य मला माहीत आहे.”

त्याला उत्तर देताना सावित्रीमधील मर्त्यता लोप पावते आणि आता तिच्या डोळ्यांमध्ये एक दिव्य देवता दिसू लागते. ती मृत्युशी संवाद साधते. ती म्हणते, “हे मृत्यो, तू सुद्धा ईश्वरच आहेस पण तू फक्त त्याची काळी छाया आहेस. वैयक्तिक आणि अवैयक्तिक, शांतता आणि शब्द, काळोख आणि प्रकाश ही सारी द्वंद्व या महान विश्वकार्यासाठी आवश्यक आहेत. तो परमेश्वरच हे सारे काही झाला आहे आणि तो त्या साऱ्यांच्या अतीतही आहे.

या विश्व-व्यापाराच्या पाठीमागे एक योजना आहे, परमप्रज्ञेने आखलेली ती योजना आहे. पण तुला सत्याचा चेहरा कोण दाखवू शकेल ? कारण हे मृत्यो, तुला जर सत्याला स्पर्श करायचा असेल तर तुला नाहीसे व्हावे लागेल.”

आता मृत्यू एकदा अखेरचे उत्तर देतो आणि म्हणतो, “अमरत्वाचा दावा करणाऱ्या हे मानवा, तुझी शक्ती प्रकट कर, तुझ्या आत्म्याचा चेहरा दाखव, मगच मी तुला सत्यवान परत देईन.”

सावित्रीमध्ये आता एक शक्तिशाली परिवर्तन घडते. आता अमरत्वाचे तेज तिच्या ठायी आले होते. एक शक्ती आणि एक अस्तित्व तिच्या व्यक्तिमत्त्वाच्या शिखरस्थानी अवतरले होते. शाश्वतता आता मृत्युच्या डोळ्यांना डोळे भिडवून पाहू लागली होती. एक आवाज कानी येतो, “सर्वशक्तिमान मृत्यो, तू माझीच सावली आहेस आणि तू माझेच साधन आहेस. मानवाने प्रकाश मिळविण्यासाठी संघर्ष करावा म्हणून मीच तुझ्या हाती ही भयाची तलवार दिली आहे. हे मृत्यो, जगाचा आत्मा असणाऱ्या सत्यवानाला आता मुक्त कर.”

पण तरीही मृत्यू प्रतिकार करत राहतो. सावित्री आणि मृत्युदेव समोरासमोर येतात. थोड्याच वेळात तिच्या दुर्दम्य शक्तीपुढे तो हरतो. तिचा तेजस्वी प्रकाश अंधाराला गिळून टाकतो.

मृत्यू स्वतःच्या साहाय्यासाठी रात्रीला, नरकाला, अचेतनाला हाक मारतो, पण कोणीही त्याच्या मदतीला धावून येत नाही. मृत्युची काळी सावली नाहीशी होते. आता सावित्री आणि सत्यवान दोघेच उरतात.

*

## शाश्वत दिन, आत्म्याची निवड आणि परम-पूर्णता

आता एक ईश्वरी वाणी सावित्रीच्या स्त्री-हृदयाशी बोलू लागते. ती पुन्हापुन्हा सावित्रीचे मन वळवू पाहते. ती ईश्वरी वाणी पुन्हा एकदा आनंदामध्ये प्रवेश करण्यासाठी सावित्रीला आवाहन करते.

परंतु पुन्हा एकदा सावित्री सांगते, “हे प्रभो, पृथ्वी आणि मानव यांच्या उद्धारासाठी मला तुझे आलिंगन दे, मला तुझा आनंद दे, मला तुझे प्रेम दे,

मला तुझे माधुर्य दे.” काही क्षणांच्या मौनानंतर ईश्वराची वाणी कानी पडते. ती वाणी म्हणते,

*“जेव्हा अतिमानव हा प्रकृतीचा राजा म्हणून जन्माला येईल तेव्हा त्याचे अस्तित्व पार्थिव जगताचे रूपांतर करेल. प्रकृतीच्या रात्रीमध्ये तो सत्याचा अग्नी चेतवेल; सत्याचा महत्तर कायदा तो या पृथ्वीवर प्रस्थापित करेल, मनुष्यदेखील मग आत्म्याच्या त्या हाकेला अभिमुख होईल. जेव्हा या पृथ्वीची जडणघडण होत होती, जेव्हा चैतन्याने या अज्ञ विश्वाला आपले निजधाम मानले होते, तेव्हा त्यावेळी प्रकृतीला अभिप्रेत असलेल्या सुप्त शक्यतांप्रत जागृत होऊन, मनुष्य स्वतःच्या हृदयामध्ये निद्रिस्त असलेल्या साऱ्या गोष्टींबाबत जागृत होऊन, सत्य, ईश्वर आणि आनंदाची अभीप्सा धरेल. तेव्हा, दिव्य कायद्याचा भावार्थ सांगणारा आणि परमश्रेष्ठाच्या योजनेचे साधन असलेला उच्चतर असा कोणी, मनुष्याला उचलून घेण्यासाठी खाली झुकेल. अदृश्य ईश्वराचे आविष्करण करण्यासाठी प्रकृती जगेल, चैतन्य मानवी लीला हाती घेईल, हे ऐहिक जीवन दिव्य जीवनात परिवर्तित होईल.”*

ईश्वराची वाणी थांबली आणि सावित्रीच्या आत्म्याने अदृश्य जगतातून खाली उडी घेतली. तिला आनंदाचे आणि विजयाचे ध्वनी ऐकू येऊ लागतात. सर्वजण तिचा जयजयकार करत असतात, स्वागत करत असतात. तिने सत्यवानाचा आत्मा स्वतःच्या आत्म्यामध्ये सामावून घेतला होता. तिला आता आढळून येते की, ती परत भूलोकावर उतरली आहे.

*

**पृथ्वीवर पुनरागमन**

आपल्या गाढ समाधीमधून जागी झाल्यावर, सावित्री जेव्हा पृथ्वीतलावर उतरली तेव्हा तिला असे दिसले की, तिचा पती सत्यवान कोमल दुर्वादलांवर सुखनिद्रा घेत आहे. आता सावित्री पुन्हा एकदा मानव झाली होती. आणि असे असूनसुद्धा तिला तिच्यामध्ये एक असीम बदल जाणवत होता. आता एक नवीन शक्ती, एक नवा आनंद, एक नवीन प्रकाश तिच्यामध्ये सामावला होता.

सत्यवान तिला विचारत होता, "सावित्री, मी तुझ्यासमवेत विविध चित्रविचित्र जगांमधून प्रवास करत होतो. जी भयंकर आकृती ईश्वर आणि आत्मा यांविषयी वादविवाद करत होती, ती कोठे गुप्त झाली ? ते स्वप्न होते की आध्यात्मिक दृष्टान्त होता ?"

सावित्रीने उत्तर दिले, ''आपला वियोग हे केवळ एक स्वप्न होते. मृत्युची काळरात्र आपण आता मागे टाकली आहे. सारे बदलले आहे आणि तरीसुद्धा सारे जसेच्या तसेच आहे. आपल्याला ईश्वराचे दर्शन झाले आहे, आपण परमसत्याशी एकरूप झालो आहोत. त्याच्या स्पर्शाने आपले प्रेम उच्चतर झाले आहे पण असे असूनही मर्त्य प्रेमाचा आनंद गमावलेला नाही. दिव्यतेच्या स्पर्शाने पार्थिवता विनाश पावत नाही तर तिच्यामध्ये परिपूर्णता येते. यापूर्वी मी जशी तुझी होते तशीच आत्ताही आहे. आता दुःखाचा मृत्यू झाला आहे. आपण या जगातील सर्वांना आनंद देऊ या. पृथ्वीवरील मनुष्याच्या आत्म्याला सत्याकडे आणि ईश्वराकडे घेऊन जाण्यासाठीच आपला जन्म आहे.''

ती दोघे घराकडे परतू लागली, तेव्हा सूर्य अस्ताचलावर आला होता. सत्यवानाच्या आगममनाची वार्ता समजताच सारा जनसमुदाय त्याच्या स्वागतासाठी सिद्ध झाला होता. सत्यवानाचे वडील द्युमत्सेन अग्रभागी होते. मृत्युदेवाच्या वरामुळे द्युमत्सेनांना दृष्टी प्राप्त झाली होती. त्यांचे राज्य त्यांना परत मिळाले होते.

सावित्रीच्या तेजस्वी मुखमंडलाकडे पाहत एक ऋषी तिला म्हणाले, "हे देवी, अशी कोणती दिव्यशक्ती आणि प्रकाश तू बरोबर घेऊन आली आहेस की ज्यायोगे या पृथ्वीवर नवयुगाचा आरंभ होत आहे ?"

सावित्री नम्रतापूर्वक उत्तर देते, "हे ऋषिवर, मी माझ्या हृदयाचे खरेखुरे सत्य जाणले आहे. प्रेम करणे आणि एकत्व अनुभवणे म्हणजेच जीवन. हेच सत्य. आपल्या जीवनाच्या परिवर्तनाचे दिव्य सत्य हेच आहे." एवढे बोलून सावित्री तिच्या अंतर्यामी उदयास आलेल्या उषेचा दिव्य प्रकाश हृदयकोंदणामध्ये झाकून ठेवत, सत्यवानासह त्या रात्रीच्या अंधाराचा भेद करत, महान उषेच्या स्वागतासाठी पुढे निघून जाते.

**

# सावित्री महाकाव्यामधील निवडक काव्यपंक्ती

एखादी प्रार्थना, एखादी दर्जेदार कृती, एखादी सर्वोत्तम कल्पना
ही माणसाच्या सामर्थ्याला सर्वातीत शक्तीशी जोडून देऊ शकते.
मग चमत्कार हाच सामान्य नियम होतो,
एखादी महान कृती वस्तुजातांचे मार्ग बदलवू शकते.
एकांतातील एखादा विचारही सर्वशक्तिमान बनतो.

- श्रीअरविंद (CWSA 33-34 : 20)

*

मानव म्हणजे जणू अनेक यंत्रांमध्ये असणारे एक यंत्रच.
मेंदू विचारांचे विविध आकार बाहेर फेकत राहतो.
स्पंदन करणारे हृदय भावनांच्या प्रणालींची मोडतोड करते.
एक संवेदन-शून्य ऊर्जा आत्म्याची रचना करते.

- श्रीअरविंद (CWSA 33-34 : 20)

*

तो आपल्या अंधकारमय घटकांमध्ये आपल्या नकळत प्रवेश करतो आणि त्या अंधकाराचा बुरखा घेऊन, तो स्वतःचे कार्य करतो. तो सूक्ष्म आणि सर्वज्ञ असा पाहुणा आणि मार्गदर्शक असतो. त्या घटकांना गरज जाणवेपर्यंत आणि त्यांच्यामध्येसुद्धा परिवर्तनाची इच्छा उदयाला येईपर्यंत तो कार्य करत राहतो. येथील सर्वांनी उच्चतर धर्माचा कायदा पाळायला शिकले पाहिजे. आपल्या शरीरातील पेशींनी अमर्त्यत्वाची ज्वाला हाती धरली पाहिजे.

- श्रीअरविंद (CWSA 33-34 : 35)

*

जेव्हा पृथ्वीची छातीच दडपवून टाकेल असा अंधकार दाटून येतो
आणि मनुष्याचे शारीर-मन हाच एकमेव दीपक असतो;
रात्रीच्या वेळी एखादा चोर जसा दबक्या पावलांनी आत शिरतो
तसा 'तो' कोणाच्याही नकळत त्याच्या घरात प्रवेश करतो.
आजवर जिचे कोणी ऐकले नाही अशी वाणी तेव्हा बोलू लागेल

आणि जीव तिचे पालन करेल.
मनाच्या अंतर्गृहामध्ये एक शक्ती लपतछपत प्रवेश करेल;
रम्यता व माधुर्य, जीवनाचे बंद दरवाजे खुले करतील.
आणि सौंदर्य हे, विरोध करणाऱ्या जगावर विजय संपादन करेल.
तत्त्व-प्रकाश, प्रकृतीचा आश्चर्यकारक रितीने ताबा घेईल.
ईश्वराचा हा लपंडाव हृदयाला आनंदित होण्यास भाग पाडेल.
आणि पृथ्वी अवचितपणे दिव्यत्वामध्ये विकसित होईल.

- श्रीअरविंद (CWSA 33-34 : 55)

*

मनुष्य आणि परमेश्वर यांच्यातील ऋण
एकमेकांना परस्परांशी बांधून ठेवते.
परमेश्वराने जसा आपला स्वभावधर्म धारण केला आहे
तसाच आपणही त्याचा स्वभावधर्म धारण केला पाहिजे;
आपण देवपुत्र आहोत आणि
तो जसा आहे तसेच आपणही असायला हवे:
आपण त्या परमेश्वराचा मानवी अंश असल्याकारणाने,
आपणही दिव्य बनले पाहिजे.
आपले जीवन हा एक विरोधाभास आहे,
ज्याची किल्ली देवापाशी आहे.

- श्रीअरविंद (CWSA 33-34 : 67)

*

हरविलेला विश्वानंद तिच्या डोळ्यांमध्ये तरळत असतो,
तिच्या भावदशा हे अनंताचे चेहरे असतात.
सौंदर्य आणि आनंद हे तिचे जन्मसिद्ध हक्क असतात.
आणि अंतविरहित परमानंद हे तिचे शाश्वतचे निवासस्थान असते.

- श्रीअरविंद (CWSA 33-34 : 118)

*

एके दिवशी शाश्वत द्वारांमागील गोपनीयता सोडून,
तो पृथ्वीवर आणि जीवनामध्ये अवतरित होईल.
जे जग त्याच्या मदतीची याचना करत आहे,
त्या जगामध्ये तो अवतरित होईल.
आत्म्याला मुक्त करणारे सत्य,
आणि जीवाला नवदृष्टी प्रदान करणाऱ्या अनुभवाचा आनंद,
तो सोबत घेऊन येईल.
*कोणीतरी जणू प्रेमाने हातच दिला आहे,*
*असे वाटावे असे सामर्थ्य तो घेऊन येईल.*

- श्रीअरविंद (CWSA 33-34 : 200)

*

आपले मानवी ज्ञान म्हणजे सत्यसूर्याच्या वेदीवर
क्षीणपणे मिणमिणणारी जणू एक मेणबत्ती !

- श्रीअरविंद (CWSA 33-34 : 280)

*

देवाच्याही मागे 'अव्यक्त परात्पर' होते.
'महन्माता' विश्वावर पाखर घालून होती.
कोणाचीही उपेक्षा न करत, जे जे काही आहे त्याचे उन्नयन करत,
दिव्य चेतनेने आपले अद्भुत अस्तित्व प्रकट केले होते.

- श्रीअरविंद (CWSA 33-34 : 313)

*

शुभ्र आध्यात्मिक झऱ्यातून उगम पावणाऱ्या तिच्या प्रदीप्त प्रेमाने,
अज्ञानजन्य अशा अगदी खोलवरच्या दुःखाला
नामशेष करून टाकले.
तिच्या चिरंतन स्मितामध्ये दुःखभोग स्वतःला हरवून बसले.

- श्री अरविंद (CWSA 33-34 : 314)

*

अरे, आवेगाच्या गुलामा, दैवसंचालित भूलोकउत्पन्न वंशा,
अनंत अशा विश्वातील क्षुद्र साहसवीरांनो,
आणि खुज्या मानवतेच्या बंदिवानांनो,
तुमच्या मर्यादित छोट्याशा 'अहम्'भोवती
आणि क्षुद्र किरकोळ गोष्टींभोवती,
मनाच्या गोलगोल फिरणाऱ्या त्याच त्या चाकोरीतून
तुम्ही किती काळ फिरत राहणार?
परिवर्तनहीन अशा क्षुद्रतेसाठी तुमचे अस्तित्व नाही,
तुमचे अस्तित्व त्याच त्या निरर्थक, निरुपयोगी
अशा पुनरावृत्तीसाठी घडविले गेलेले नाही.

- श्रीअरविंद (CWSA 33-34 : 370)

*

एके दिवशी मला माझे महन्मधुर विश्व गवसलेले असेल.
देवतांचे भयानक मुखवटे दूर सारून, भीतीचे बुरखे फाडून
आणि पापावरील आवरण फेकून देत,
शांत झालेलो आपण आपल्या दिव्य मातेच्या सन्मुख नेले जाऊ.
आपण आपले प्रांजल जीव तिच्या मांडीवर ठेवू.
तेव्हा मग आपण ज्या परमानंदाच्या शोधात होतो
तो परमानंद आपल्याला गवसेल.
दीर्घकाळ आपण ज्याचा शोध घेत होतो
त्या देवतांसोबत आपण सद्गदित होऊ;
तेव्हा मग आपल्याला अवचितपणे स्वर्गातील पावित्र्याचा लाभ होईल.

- श्रीअरविंद (CWSA 33-34 : 613)

*

ईश्वरी घटिका जेव्हा समीप येईल
तेव्हा 'महाशक्तिशाली माता' काळाच्या उदरामध्ये जन्म घेईल
आणि मानवी भूमितून 'देव' जन्माला येईल

तुमच्या मानवी जीवनांनी तयार केलेल्या रूपांमध्ये
तो जन्माला येईल.

- श्रीअरविंद (CWSA 33-34 : 705)

*

या अनिश्चित आणि संदिग्ध जगामध्ये,
जे स्वतःच्या दृढ विश्वासावर पाय रोवून अविचल राहतात,
किंवा जे आपल्या हृदयाच्या सुपीक भूमिमध्ये
आध्यात्मिक निश्चिततेच्या धान्याचा एखादा लहानसा दाणा पेरतात,
ती माणसं आनंदी असतात.

- श्रीअरविंद (CWSA 33-34 : 499)

*

प्रकृतीच्या रात्रीमध्ये तो सत्याचा अग्नी चेतवील
सत्याचा महत्तर कायदा तो या पृथ्वीवर प्रस्थापित करेल
मानवसुद्धा मग आत्म्याच्या त्या हाकेला अभिमुख होईल.
जेव्हा ह्या पृथ्वीची जडणघडण होत होती
जेव्हा चैतन्याने या अज्ञ विश्वाला आपले निजधाम मानले होते
तेव्हा प्रकृतीला जे अभिप्रेत होते
त्या सुप्त शक्यतांप्रत जागृत होऊन,
त्याच्या हृदयामध्ये निद्रिस्त असलेल्या
साऱ्या गोष्टींबाबत जागृत होऊन,
तो सत्य, ईश्वर आणि आनंदाची अभीप्सा धरेल.
तेव्हा, दिव्य कायद्याचा भावार्थ सांगणारा आणि
परमश्रेष्ठाच्या योजनेचे साधन असलेला
उच्चतर असा कोणी, माणसाला उचलून घेण्यासाठी खाली झुकेल.

- श्रीअरविंद (CWSA 33-34 : 708-709)

**

# परिशिष्ट ०१

## ‘सावित्री’ महाकाव्याची मांडणी

‘सावित्री’ महाकाव्यामध्ये एकूण ३ खंड आहेत. यातील पहिला भाग - अश्वपतीचा योग, दुसरा भाग - सावित्रीचा योग आणि तिसरा भाग - सावित्री व मृत्यू संवाद यास वाहिलेला आहे. यामध्ये १२ पर्व असून ४९ सर्ग (अध्याय) आहेत. त्यांची मांडणी पुढीलप्रमाणे आहे-

| सर्ग क्रमांक (कँटो) | सर्ग |
|---|---|
| | **खंड ०१** |
| | **पर्व १ - आदि पर्व** |
| ०१ | प्रतीकात्मक उषा |
| ०२ | उत्पत्ती |
| ०३ | राजाची योगसाधना - आत्म्याच्या मुक्तीचा योग |
| ०४ | गुह्य ज्ञान |
| ०५ | आत्मचैतन्याची मुक्ती व महानता यांचा योग |
| | **पर्व २ - विश्व-प्रवासी पर्व** |
| ०१ | विविध जगतांची शिडीसारखी मांडणी |
| ०२ | सूक्ष्म भौतिकाचे राज्य |
| ०३ | जीवनाचे वैभव व अधःपतन |
| ०४ | क्षुद्र जीवन असणारी राज्ये |
| ०५ | क्षुद्र जीवनाच्या देवदेवता |
| ०६ | अधिक उच्च जीवनाची राज्ये व देवदेवता |
| ०७ | महारात्रीमध्ये शिरकाव |
| ०८ | असत्याचे जग, पापाची जननी व अंध:काराचे पुत्र |
| ०९ | जीवनाच्या देवतांचे नंदनवन |

| | |
|---|---|
| १० | लहान मनाची राज्ये व त्यांची दैवते |
| ११ | उच्चतर मनाची राज्ये व त्यांची दैवते |
| १२ | आदर्शाचे स्वर्ग |
| १३ | मनाच्या स्वरूपामध्ये |
| १४ | विश्वात्मा |
| १५ | अधिक श्रेष्ठ ज्ञानाचे प्रदेश |
| | **पर्व ३ - दिव्य माता पर्व** |
| ०१ | अज्ञेयाचा शोध |
| ०२ | दिव्य मातेची आराधना |
| ०३ | आत्म्याचे निवासस्थान व नवनिर्मिती |
| ०४ | दिव्य दर्शन व वरप्राप्ती |
| | **खंड ०२** |
| | **पर्व ४ - जन्म आणि शोध पर्व** |
| ०१ | दिव्य ज्योतीचा जन्म व बालपण |
| ०२ | दिव्य ज्योतीचा विकास |
| ०३ | शोधकार्याविषयी आंतरिक हाक |
| ०४ | शोधकार्य |
| | **पर्व ५ - प्रेम पर्व** |
| ०१ | भेटीचे नियोजित स्थळ |
| ०२ | सत्यवान |
| ०३ | सत्यवान व सावित्री |
| | **पर्व ६ - नियती पर्व** |
| ०१ | नियतीचा शब्द |
| ०२ | नियतीचा मार्ग व वेदनेचा प्रश्न |
| | **पर्व ७ - योग पर्व** |
| ०१ | मीलनानंद, मृत्युचे पूर्वज्ञान आणि दुःख |

| | |
|---|---|
| ०२ | आत्म्याच्या शोधासंबंधीची कथा |
| ०३ | आंतरिक प्रदेशांमध्ये प्रवेश |
| ०४ | आत्म्याच्या त्रिविध शक्ती |
| ०५ | आत्म्याचा शोध व साक्षात्कार |
| ०६ | निर्वाण व सर्व-नकारात्मक एकमेवाद्वितीयाचा शोध |
| ०७ | विश्वात्मा आणि विश्वचेतनेचा शोध |
| | **पर्व ८ - मृत्यू पर्व** |
| ०१ | अरण्यातील मृत्यूची घटना |
| | **खंड ०३** |
| | **पर्व ९ - शाश्वत निशा पर्व** |
| ०१ | काळ्याकभिन्न महा-रिक्ततेच्या दिशेने |
| ०२ | शाश्वत महारात्रीतील प्रवास व महाअंधकाराची वाणी |
| | **पर्व १० - द्विसंधिप्रकाश पर्व** |
| ०१ | आदर्शाचा स्वप्नमय संधिप्रकाश |
| ०२ | मृत्युचे तत्त्वज्ञान व आदर्शांसंबंधीचा व्यर्थ पोकळपणा |
| ०३ | प्रेम व मृत्यू यांच्यामधील वाद-संवाद |
| ०४ | पार्थिव वास्तवतेचा स्वप्नवत संधिप्रकाश |
| | **पर्व ११ - शाश्वत दिन पर्व** |
| ०१ | शाश्वत दिवस -<br>आत्म्याने केलेली निवड व परम पूर्णत्व |
| | **पर्व १२ - उपसंहार** |
| ०१ | पृथ्वीवर पुनरागमन |

# परिशिष्ट ०२

## सावित्री महाकाव्यावरील मराठीतील लेखन

### 'सावित्री' महाकाव्याचे प्रकाशित मराठी अनुवाद

**०१) सावित्री - एक आख्यायिका आणि एक प्रतीक**

सौ. शैलजादेवी वहिनीसाहेब प्रतिनिधी यांनी केलेला हा अनुवाद, श्रीअरविंद-आश्रम, पुडुचेरी यांच्यातर्फे प्रकाशित झालेला आहे. तो छंदोबद्ध भावानुवाद आहे. हा अनुवाद १९९३ साली प्रकाशित झाला.

**०२) श्रीअरविंद सावित्री**

हा अनुवाद कवी नृसिंहाग्रज यांनी केला आहे. इ. स. १९९५ साली प्रकाशित झालेला हा ग्रंथ मुक्तछंदात अनुवादित करण्यात आलेला आहे.

**०३) श्रीअरविंद विरचित सावित्री (भावानुवाद)**

श्रीमती प्रज्ञा सुखटणकरकृत हा भावानुवाद गद्य स्वरूपातील आहे. तो द्विखंडात्मक आहे.

*

### सावित्री महाकाव्यासंबंधी अन्य लेखन

**०१) संक्षिप्त सावित्री**

श्री. माधव पंडित लिखित The Summary of Savitri या पुस्तकाचा अनुवाद श्री.सुहास टिल्लू यांनी केला आहे. हा अनुवाद इ. स. १९९९ मध्ये प्रकाशित करण्यात आलेला आहे.

**०२) श्रीमाताजी सावित्रीविषयी**

सावित्रीवरील एक महत्त्वाचे पुस्तक म्हणून या पुस्तकाचा उल्लेख करावा लागेल. श्रीमाताजींनी सावित्री महाकाव्याविषयी वेळोवेळी जे कथन केले, भाष्य केले, पत्रे लिहिली, प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून काही सांगितले, त्यांनी जे संदेश दिले त्या साऱ्याचे इंग्रजीमध्ये संकलन श्री. आर. वाय. देशपांडे यांनी केले आहे. The Mother on Savitri या पुस्तकाचा मराठी अनुवाद श्री. प्रभाकर नुलकर यांनी केला आहे. एप्रिल इ. स. २०१५ मध्ये याचे प्रकाशन करण्यात आले.

**०३) महाकवी श्रीअरविंद यांच्या सावित्री महाकाव्यातील तत्त्वज्ञान**

प्रा. ग. ना. जोशी लिखित ४६४ पृष्ठांचे, हे पुस्तक मराठीतून 'सावित्री' हा ग्रंथ समजावून घेण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरावे, असे आहे.

**

# परिशिष्ट ०३

## सावित्री - आख्यायिका आणि रूपक

(कवी नृसिंहाग्रज ऊर्फ ल. गो. जोशी कृत 'श्रीअरविंद सावित्री' या ग्रंथात श्री. प्रभाकर नुलकर यांची प्रस्तावना देण्यात आली आहे. 'सावित्री' या ग्रंथाचा एकंदर परिचय होण्याच्या दृष्टीने ती महत्त्वाची आहे.)

मरणाधीन झालेल्या सत्यवानाचे प्राण मृत्युच्या पाशातून खेचून आणणाऱ्या सती 'सावित्री'ची आख्यायिका सर्वश्रुत आहे. या साध्यासुध्या दिसणाऱ्या कथेमागे काहीतरी गूढार्थ भरला असावा असे श्रीअरविंदांना वाटत होते. विशेषतः त्या कथेतील पात्रांची नावे त्यांना प्रतीकात्मक वाटली आणि एका वेगळ्याच दृष्टिकोनातून त्या रूपकाचा त्यांनी उलगडा केला. त्यातूनच अमरत्वाची अभीप्सा धरणाऱ्या मानवजातीचे रूपक स्पष्ट करणारे महाकाव्य सिद्ध झाले.

एका अर्थी श्रीअरविंदांना वेदार्थाचा जसा उलगडा झाला त्याच प्रकारे त्यांनी 'सावित्री'च्या सर्वपरिचित पुराणकथेतील गर्भितार्थ उलगडला, असे म्हणावयास हरकत नाही. म्हणजे असे की, योगसाधना करताना श्रीअरविंदांना जे अनुभव आले तेच वेदकालीन ऋषींचे अनुभव होते, असे नंतर त्यांच्या प्रत्ययाला आले. विसाव्या शतकाच्या प्रारंभी अंतिम सत्याच्या शोधार्थ निघालेल्या श्रीअरविंदांना योगाभ्यास करताना जे अनुभव आले त्यांना, वेदकालीन ऋषींच्या हजारो वर्षांपूर्वीच्या अनुभवातून फक्त पुष्टी मिळाली. श्रीअरविंद वेदमंत्रांचा अर्थ धुंडाळीत गेले असे नव्हे; तर ध्यानधारणा करत असताना त्यांच्या अंतर्मनासमोरच वेदातील काही प्रमुख देवता उभ्या ठाकल्या.

'निरुक्त'कार यास्क यांनी म्हटल्याप्रमाणे, वेदकालीन ऋषींनी आधी 'तप' केले व त्यातूनच त्यांना मंत्रांचे स्फुरण झाले. हे ऋषी रूढ अर्थाने 'तत्त्ववेत्ते' नव्हते तर 'द्रष्टे' होते. त्यांनी अंतिम सत्य प्रत्यक्ष 'पाहिले', त्या सत्याचा ध्वनी 'ऐकला' आणि अत्यंत काव्यमय व नादमधुर भाषेत त्यांचा उच्चार केला. वेदकालानंतर, हजारो वर्षांनी पाँडिचेरीच्या योगभूमीवर

श्रीअरविंदांनी असेच ‘तप’ केले व त्यातूनच त्यांना वेद मंत्रातील रहस्याचे साक्षात्कारी स्फुरण होऊन ऋषिपद प्राप्त झाले.

वेदातील गूढार्थाची उकल म्हणजे श्रीअरविंदांचे बौद्धिक गूढगुंजन वा काव्यात्मक कल्पना नव्हती तर ती सत्याची प्रत्यक्ष अनुभूती व साक्षात्कार होता. आणि केवळ वेदच नव्हे तर उपनिषद व गीता यांच्याही शब्दार्थामागे लपलेल्या गर्भितार्थाचे आकलन श्रीअरविंदांना याच मार्गाने झाले. ‘सावित्री’च्या आख्यायिकेमागील रूपक हा त्या पुढचा महत्त्वाचा व निर्णायक टप्पा आहे.

सत्यदर्शनाच्या व आत्मसाक्षात्काराच्या क्षेत्रात वेद, उपनिषद व गीता यांच्यानंतर श्रीअरविंदांच्या ‘दिव्य जीवना’ला स्थान आहे. अंतःस्फूर्त ज्ञानाने उजळलेले वेद, मनाच्या तार्किक व चिंतनशील शक्तीचा प्रकर्ष दाखविणारे उपनिषद आणि ज्ञान-भक्ति-कर्म-योगाची सांगड घालणारी गीता हे जर आपापल्या काळातील आध्यात्मिक उत्थानाचे समन्वय (Synthesis) होते असे मानले तर आजच्या काळात या महासमन्वयाचे स्थान श्रीअरविंदांच्या ‘दिव्य जीवना’च्या साक्षात्काराला देता येईल.

आदितत्त्वाने नेणीवरूपी तमात खोलवर बुडी घेतल्यावर ते पुन्हा जाणीवयुक्त दिव्यतेकडे उत्क्रांत होत आहे. जडातून वनस्पती, वनस्पतीतून प्राणी, प्राण्यातून मानव या उत्क्रांतिक्रमात मानवातून अतिमानव निर्माण करणे हे निसर्गाचे व नियतीचे उद्दिष्ट आहे. निसर्गाच्या स्वतःच्या गतीने जीवसृष्टीतून मानवी सृष्टी निर्माण होण्यास अक्षरशः लाखो वर्षे लागली, पण मानवातून अतिमानव उत्क्रांत होण्याचे काम असे दीर्घकाळ रेंगाळत ठेवण्याचे कारण नाही. मनाच्या भूमीवरून अतिमानसाच्या भूमिकेवर उत्क्रांत होण्याचे व आरोहण करण्याचे काम अधिक गतिशील व सहेतुक करावयाचे असेल तर समर्पणयोगाची कास धरली पाहिजे.

या आरोहणात मानवाकडून प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची तर गरज आहेच, पण त्याच्या साहाय्यासाठी दैवी कृपेचे अवतरण होण्याचीही तितकीच आवश्यकता आहे. मानवी प्रयत्न व दैवी कृपा यांचे हे सामरस्य

श्रीअरविंदांनी 'सावित्री'च्या पुराणकथेत पाहिले. भद्र देशाची राजकन्या आणि शाल्व देशाचा राजपुत्र यांच्या प्रगाढ प्रीतीची, मृत्यूवर मात करून अमरत्वाचा प्याला हस्तगत करणारी आणि प्रेम व एकत्व यांतच जीवनाचे रहस्य व सार्थकता शोधणारी ही विलक्षण कथा श्रीअरविंदांच्या कविहृदयाला भावली आणि आपल्या उत्तुंग प्रतिभेने त्यांनी एका पुरातन आख्यायिकेला आधुनिक काळातील योगसाधनेचे स्पंदन ऐकविणारे रूपक बनविले. अशा रितीने पुराणातील 'सावित्री' ही 'श्रीअरविंद सावित्री'बनली.

तसे पाहिले तर आपल्या बडोद्याच्या वास्तव्यातच श्रीअरविंदांनी 'सावित्री'च्या लेखनाला प्रारंभ केला होता. नंतरच्या पन्नास वर्षांच्या काळात त्यांनी या काव्याचे पुनःपुन्हा परिष्करण केले. स्वतःच्या योगसाधनेत येणारे नवे नवे अनुभव त्यांना 'सावित्री'च्या संहितेत सुधारणा करण्यास भाग पाडीत.

इ. स. १९३८ मध्ये मांडीचे हाड मोडून अपघात झाल्यानंतर त्यांनी आधी 'दिव्य जीवन' ग्रंथावर शेवटचा हात फिरवला आणि इ. स. १९४० च्या सुमारास पुन्हा 'सावित्री'चे लेखन हाती घेतले. फरक इतकाच की आतापर्यंत त्यांनी स्वतःच्या हस्ताक्षरात 'सावित्री'चे लेखन केले; पण अपघातानंतरच्या काळात मात्र त्यांनी आपली देखभाल करणारे डॉ. निरोदबरन यांना 'सावित्री' महाकाव्याचे 'लेखकु' बनवले.

'श्रीअरविंदांसमवेत बारा वर्षे' या प्रसिद्ध आठवणीच्या ग्रंथात लिहिताना डॉ. निरोदबरन म्हणतात की, आपल्या ऐहिक आयुष्याचे अखेरचे एक दशक श्रीअरविंद पूर्णपणे 'सावित्रीमय' झाले होते. आपल्या अंतिम क्षणापर्यंत त्यांनी 'सावित्री' पुरी व परिपूर्ण करण्याचा एकच ध्यास घेतला होता. आपल्या लौकिक जीवनाच्या अंतापर्यंत श्रीअरविंदांनी 'सावित्री'ची साथ करावी हेही प्रतीकात्मकच आहे. कारण 'सावित्री'हे केवळ काव्य नाही तर ती एक योगसाधना होती.

अज्ञानाच्या जोखडातून मुक्त होऊन दिव्य ज्ञान, शक्ती, आनंद, अमरता यांची अभीप्सा करणाऱ्या जागृत मानवाच्या स्वरूपात भद्र देशाचा अधिपती अश्वपती आपणाला भेटतो. आत्मज्ञान, जगताचे ज्ञान आणि

जगदीशाचे ज्ञान करून घेण्यासाठी त्याने केलेली विविध प्रकारची योगसाधना श्रीअरविंदांनी वर्णिलेली आहे. आध्यात्मिक उपलब्धीचे शिखर गाठल्यावर अश्वपती जगन्मातेला अशी प्रार्थना करतो की, तिने मानवी देहात जन्म घ्यावा. कारण त्याशिवाय मर्त्य जिवाचा उद्धार होणार नाही.

या विनंतीला मान देऊन जगन्माता अश्वपतीची कन्या म्हणून जन्म घेते. दिव्य कृपेचे प्रतीक असलेली तीच 'सावित्री'. मृत्युच्या आसमंतात सत्य प्रस्थापित करण्याचा निष्फळ प्रयत्न करणारा मानव म्हणजे सत्यवान. मृत्युच्या मगरमिठीत आणि अज्ञानात उतरलेल्या मानवी आत्म्याला वाचविण्यासाठी 'सावित्री' पृथ्वीतलावर उतरलेली असते. मृत्युच्या अधिपतीला ती धैर्याने व निकराने तोंड देते. आपल्या आत्मज्योतीच्या प्रकाशाने ती मृत्युचे सावट दूर करून मानवाला अमरत्व मिळवून देते. मानवाच्या अभ्युदयासाठी दिव्य शक्तीचे व दिव्य कृपेचे पृथ्वीवरील अवतरण हा 'सावित्री'चा गाभा आहे. त्यातील अश्वपतीचा योग म्हणजे श्रीअरविंदांचा योग व 'सावित्री'ची साधना म्हणजे श्रीमाताजींची साधना असे एका मर्यादेपर्यंत परंपरेने मानले जाते.

'सावित्री' महाकाव्याविषयी जितके लिहावे, बोलावे तितके थोडेच आहे. एखाद्या महासागराचे पाणी मुठीत पकडण्याचा तो निष्फळ प्रयत्न आहे. नलिनीकांत गुप्ता, अंबालाल पुराणी, के. डी. सेठना, माधव पंडित, प्रेमा नंदकुमार, रामेश्वर गुप्ता, व्ही. के. गोकाक, शिशिरकुमार घोष आदींनी त्यावर खूप व वेगवेगळ्या तऱ्हेने लिहिले आहे.

'संपूर्ण समर्पण' हा श्रीअरविंद माउली प्रणित योग साधनेचा गाभा आहे. या समर्पित भावनेने 'सावित्री'चे वाचन व मनन करणाऱ्यांना पृथ्वीवर मानव कल्याणार्थ अवतरलेली ती जगन्माउली आपल्या दिव्य कृपेचा प्रसाद भरभरून दिल्यावाचून कशी राहील?

**

“जेव्हा अतिमानव हा प्रकृतीचा राजा म्हणून जन्माला येईल
तेव्हा त्याचे अस्तित्व पार्थिव जगताचे रूपांतर करेल.
प्रकृतीच्या रात्रीमध्ये तो सत्याचा अग्नी चेतवेल;
सत्याचा महत्तर कायदा तो या पृथ्वीवर प्रस्थापित करेल,
मनुष्यदेखील मग आत्म्याच्या त्या हाकेला अभिमुख होईल
जेव्हा या पृथ्वीची जडणघडण होत होती,
जेव्हा चैतन्याने या अज्ञ विश्वाला आपले निजधाम मानले होते,
तेव्हा त्यावेळी प्रकृतीला अभिप्रेत असलेल्या
सुप्त शक्यतांप्रत जागृत होऊन,
मनुष्य स्वतःच्या हृदयामध्ये निद्रिस्त असलेल्या
साऱ्या गोष्टींबाबत जागृत होऊन,
सत्य, ईश्वर आणि आनंदाची अभीप्सा धरेल.
तेव्हा, दिव्य कायद्याचा भावार्थ सांगणारा
आणि परमश्रेष्ठाच्या योजनेचे साधन असलेला
उच्चतर असा कोणी,
मनुष्याला उचलून घेण्यासाठी खाली झुकेल.
अदृश्य ईश्वराचे आविष्करण करण्यासाठी प्रकृती जगेल,
चैतन्य मानवी लीला हाती घेईल,
हे ऐहिक जीवन दिव्य जीवनात परिवर्तित होईल.”

- श्रीअरविंद

तुम्ही सावित्रीचे वाचन रिक्त डोक्याने केले पाहिजे, मनाची पाटी कोरी करून वाचन केले पाहिजे, म्हणजे मनामध्ये इतर कोणतेही विचार असता कामा नयेत; तुम्ही लक्ष एकाग्र केले पाहिजे आणि रिक्त, स्थिरचित्त व खुले राहिले पाहिजे; असे केलेत तर सावित्रीमधील शब्द, लय, स्पंदने या पांढऱ्या कागदावर थेटपणे उतरतील आणि तुमच्या मेंदूवर त्याचा ठसा उमटवतील आणि सावित्रीमधील ते शब्द, ती लय, ती स्पंदने स्वतःहूनच तुम्हाला त्यांचा अर्थ उलगडवून दाखवतील आणि त्यानंतर अगदी विनासायास तुम्हाला त्यांचा अर्थ स्पष्ट होईल.

- श्रीमाताजी